रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३२३
www.ramprahar.com
रविवार, ११ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

बोगस बियाणे विकणाऱ्यांनो सावधान! १० वर्षांची शिक्षा/२
रविवारनिमित्त 'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४, ५
टीम इंडिया थेट एशिया कपच्या अंतिम फेरीत खेळणार/८

### मान्सून महाराष्ट्रात दाखल होण्यास अनुकूल वातावरण



**मुंबई :** केरळमध्ये दाखल झालेला मान्सून आगामी ४८ तासांमध्ये महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे. केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, गोवा आणि महाराष्ट्रातील काही भागांत मान्सून दाखल होण्यासाठी अनुकूल वातावरण आहे, असे हवामान खात्याने म्हटले आहे. मान्सून पश्चिम किनारपट्टीवरील कर्नाटकातील कारवारपर्यंत पुढे सरकलाय. पुढील ४८ तासांत गोवा आणि महाराष्ट्राच्या काही भागांत तो आणखी सरकण्याचा अंदाज आहे. दरम्यान, 'बिपरजॉय' चक्रीवादळाचा मान्सूनच्या तीव्रतेवर परिणाम होत आहे. असे असले तरी मान्सून दक्षिण आणि मध्य अरबी समुद्राचा काही भाग, लक्षद्वीप, केरळचा बहुतांश भाग आणि दक्षिण तामिळनाडू, कोमोरिन क्षेत्राचा उर्वरित भाग, मन्नारची खाडी, नैऋत्य, मध्य व ईशान्य बंगालच्या उपसागरात पुढे सरकला आहे.

# उद्धव ठाकरे भूमिका स्पष्ट करा

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचे नांदेडमध्ये आव्हान



**नांदेड : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे हे सत्तेसाठी आणि मुख्यमंत्री होण्यासाठी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या मांडीवर बसले. त्यांनी भाजपला धोका दिला, अशा शब्दांत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी (दि. १०) नांदेडमध्ये हल्लाबोल केला. उद्धव ठाकरेंनी समान नागरी कायदा, मुस्लीम आरक्षण, ट्रिपल तलाकविरुद्ध कायदा, कलम ३७०, राम मंदिर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल आपली भूमिका स्पष्ट करावी, असे आव्हानही या वेळी गृहमंत्री शाह यांनी त्यांना दिले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नांदेडमध्ये जाहीर सभा झाली. या वेळी त्यांनी लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले. आगामी लोकसभा निवडणुकीत भाजप युती महाराष्ट्रातून ४५ जागा जिंकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वेळी गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांचाही समाचार घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवादाला संपवण्याचे काम केले तसेच सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईक करून पाकिस्तानला जागा दाखवली. एकीकडे पंतप्रधान मोदी देशाची मान अभिमानाने उंचावत असताना राहुल गांधी मात्र परदेशात वाईट बोलत आहेत. इथे त्यांचे ऐकायला कुणी नसल्याने ते बाहेर देशात जाऊन बोलत आहेत, असा टोला या वेळी गृहमंत्री शाह यांनी लगावला.

### *महाराष्ट्रात एकच पॅटर्न -उपमुख्यमंत्री*



*या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा समाचार घेताना म्हटले की, काँग्रेसवाले म्हणतात महाराष्ट्रात कर्नाटक पॅटर्न आणू, परंतु कालपर्यंत त्यांना कर्नाटक म्हटल्यावर राग यायचा, पण मी त्यांना एकच सांगेन महाराष्ट्रात एकच पॅटर्न चालतो तो म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज पॅटर्न. तो पॅटर्न या संपूर्ण देशात कोणी आणला असेल तर तो पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आणला आहे. आपल्याला २०१४मध्ये देशात विजय मिळाला, २०१९मध्येही मोठा विजय मिळाला. आता २०२४च्या विजयाची तयारी आपण सुरू केली आहे.*



## मावळ लोकसभा मतदारसंघात भाजपचे संयुक्त मोर्चा संमेलन

### मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रशांत ठाकूर यांचे मार्गदर्शन



**मावळ : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या नवव्या वर्षपूर्तीनिमित्त राबविण्यात येणाऱ्या महाजनसंपर्क अभियान अंतर्गत मावळ लोकसभा मतदारसंघातील तळेगाव दाभाडे येथे संयुक्त मोर्चा संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी राज्याचे पर्यटन विकासमंत्री मंगलप्रभात लोढा आणि भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले.

या संमेलनास आमदार उमाताई खापरे, माजी मंत्री बाळा भेगडे, पुणे जिल्हाध्यक्ष गणेश भेगडे, चिंचवड विधानसभेचे नेते शंकरशेठ जगताप, रवींद्र भेगडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी मोदी @ ९ अभियानाच्या अनुषंगाने मावळ लोकसभा क्षेत्रात सुरू असलेल्या संघटनात्मक कार्याचा आढावा मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी घेतला व प्रत्येक पदाधिकारी, कार्यकर्त्याने आगामी काळात संघटनात्मक जबाबदाऱ्या चोख पार पाडून पंतप्रधान नरेंद्र यांनी गत नऊ वर्षांमध्ये सेवा, सुशासन आणि गरिबांच्या कल्याणासाठी राबविलेल्या विविध योजनांची तसेच विकासकामांची माहिती बूथ स्तरापर्यंत घरोघरी जाऊन पोहचविण्याच्या सूचना केल्या.

आमदार प्रशांत ठाकूर यांनीही कार्यकर्त्यांना बहूमोल मार्गदर्शन करून पक्षवाढीसाठी अथक मेहनत घ्यावी, असे आवाहन केले.

## राष्ट्रवादीच्या कार्यकारी अध्यक्षपदी सुप्रिया सुळे, प्रफुल्ल पटेलांची नियुक्ती




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी शनिवारी (दि. १०) दिल्लीत पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मोठी घोषणा केली. त्यांनी खासदार सुप्रिया सुळे आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्यावर पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. याशिवाय त्यांच्यासह इतर काही नेत्यांवर अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली आहे.

राष्ट्रवादीत कार्यकारी अध्यक्ष हे नवीन पद तयार करण्यात आले असून या पदावर सुप्रिया सुळे आणि प्रफुल्ल पटेल या दोघांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुळे यांच्याकडे महाराष्ट्र, पंजाब आणि हरियाणा विधानसभेचीही जबाबदारी असेल तसेच पटेल यांच्यावर गुजरात, मध्य प्रदेश आणि गोव्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सुळे आणि पटेल यांच्यासह सुनील तटकरे, जितेंद्र आव्हाड यांनादेखील राष्ट्रीय राजकारणातील जबाबदारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्याकडे मात्र कोणतीही जबाबदारी देण्यात आलेली नाही. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

## रेवदंडा-साळाव पुलावरून आजपासून हलकी वाहतूक सुरू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पर्यटनस्थळाकडे जाण्यासाठी असलेल्या रेवदंडा-साळाव या प्रमुख पुलाच्या दुरूस्ती अंतर्गत लोड टेस्टींगचे काम पूर्ण झाले असून रविवार (दि. ११)पासून पाच टनांच्या आतील वाहनांसाठी पुलावरून वाहतूक सुरू होणार आहे, तर एसटी बससह इतर अवजड वाहनांना आणखी आठ दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

रेवदंडा-साळाव पुलाच्या बेरिंग नादुरुस्त झाल्याने दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले होते. यासाठी आठ कोटी ६५ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. तत्पूर्वी तीन महिन्यांपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने या पुलावरून पाच टनांवरील वाहनांच्या वाहतुकीस बंदी घातली होती. त्यानंतर लोड टेस्टींगकरिता ८ ते १० जूनपर्यंत सर्व वाहनांना बंदी होती. आता लोड टेस्टींगचे काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती अभियंता विशाल देवकर यांनी दिली. त्यामुळे रविवारपासून दुचाकी, तीन चाकी तसेच आकाराने लहान अशा चारचाकी गाड्यांची वाहतूक सुरू होणार आहे.

## निवडक

### मुंबईत ५० कोटींचे ड्रग्ज जप्त; तीन जणांना अटक

**मुंबई :** अमली पदार्थ नियंत्रण विभागाने (एनसीबी) मुंबईच्या डोंगरी परिसरात केलेल्या कारवाईत २० किलो मेफेड्रोन (एमडी) जप्त केले आहे. या प्रकरणी महिला तस्करासह तिघांना अटक करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची किंमत ५० कोटी रुपये असून या छाप्यात एक कोटी १० लाखांची रोख रक्कम व १८६ ग्रॅम सोन्याचे दागिनेही हस्तगत करण्यात आले आहेत.

### मृत सरस्वती वैद्यवर उद्या होणार अंत्यसंस्कार

**ठाणे :** मीरा रोड येथे राहणाऱ्या सरस्वती वैद्य या तरुणीची लिव्ह इन पार्टनर मनोज साने याने निर्घृण हत्या केल्याने खळबळ उडाली होती. सरस्वतीच्या बहिणींनी तिच्या शरीराचा ताबा देण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे. त्यामुळे बहिणीची सोमवारी (दि. १२) डीएनए चाचणी होणार आहे. याचा अहवाल आल्यानंतर सरस्वतीच्या शरीरावर अंत्यसंस्कार होतील.

## संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**देहू : प्रतिनिधी**

आषाढी वारी सोहळ्यासाठी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीने शनिवारी (दि. १०) पंढरपूरकडे प्रस्थान केले. या वेळी वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा प्रस्थान सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात झाला. इनामदार वाड्यातील पहिल्या मुक्कामानंतर रविवारी पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होईल. देहूतून बाहेर पडताच अनगडशहा बाबांच्या दर्ग्यापाशी पालखीची आरती होईल. मग ज्ञानोबा-माऊली तुकारामाच्या गजरात वारकरी पंढरपूरच्या दिशेने वाटचाल करतील.

शुक्रवारपासूनच देहू नगरीत शेकडोच्या संख्येने वारकरी दाखल झाले होते. शनिवारी पहाटे इंद्रायणी नदीत स्नान करून वारकऱ्यांनी तुकोबांचे दर्शन घेतले. यानंतर सोहळ्यास सुरुवात झाली. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, सुनील शेळके, हर्षवर्धन पाटील, सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झाली.

वर्षातून एकदा येणाऱ्या या आषाढी वारीसाठी देहू, आळंदीमध्ये हजारो वारकरी दाखल होतात. टाळ-मृदंगाच्या तालावर, ज्ञानोबा-तुकोबाच्या गजरामध्ये देहभान हरपून वारकऱ्यांनी स्वतःला झोकून दिल्याचे दिसून आले.



**उरण : सबका साथ, सबका विश्वास अशी विचारधारा असलेल्या भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्यांचा ओघ सातत्याने वाढत आहे. यालाच अनुसरून उरण विधानसभा क्षेत्रातील विविध पक्षांचे कार्यकर्ते, सरपंच, सदस्य यांनी शनिवारी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत विकासाचे 'कमळ' हाती घेतले. सर्वांचे पक्षात स्वागत करण्यात आले.** (छाया : दिनेश पवार) **वृत्त उद्याच्या अंकात.**

## शिवराज्याभिषेक सोहळ्यात एसटीची दमदार कामगिरी

### पावणे पाच लाखांहून अधिक शिवप्रेमींनी केला प्रवास

**महाड : प्रतिनिधी**

रायगडावर नुकत्याच झालेल्या ३५०व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यामध्ये आलेल्या लाखो शिवप्रेमींना गडाच्या पायथ्यापर्यंत पोहचवण्याची दमदार कामगिरी एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी केली. १ ते ७ जून या कालावधीत सलग सात दिवस एसटीच्या दीडशे बसेस कोंझर ते रायगड पायथा वाय जंक्शन अशा धावत होत्या. यातून सुमारे चार लाख ७० हजार शिवभक्तांनी प्रवास केल्याची माहिती महाड एसटी आगारप्रमुखांनी दिली.

राज्य शासनाच्या वतीने किल्ले रायगडावर ३५०वा शिवराज्याभिषेक जल्लोषात साजरा झाला. हा सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो शिवप्रेमी रायगडावर आले होते. शिवराज्याभिषेक सोहळ्याची तयारी गेले महिनाभर सुरू होती. विविध प्रकारच्या नियोजनात एसटी बससेवा महत्त्वाची होती. रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या कोंझर घाटामध्ये वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता कोंझर आणि वाळसुरे गावाजवळ पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती. या पार्किंग व्यवस्थेपासून रायगडपर्यंत जवळपास दीडशे एसटी बसेस सोडण्यात आल्या.



> *जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार महाड एसटी आगाराने शिवराज्याभिषेक सोहळ्याकरिता सुमारे १५० बसेसचे नियोजन केले होते. चालकांनी आपली सेवा बजावत लाखो शिवप्रेमींना सुरक्षितरित्या प्रवास घडवून आणला. ३५०व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यात सेवा करण्याची संधी मिळाल्याने एसटी कर्मचारीही आनंद व्यक्त करीत आहेत.*
>
> **-रितेश फुलपगार,** *प्रमुख, महाड एसटी आगार*

सात दिवस महाड आगारासह रायगड विभाग, सातारा विभाग, रत्नागिरी विभाग यांच्या जवळपास १५० बसेस उपलब्ध करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे ३०० चालक, २५ मेकॅनिक, चार सुपरवायझर, तर १२ वाहतूक नियंत्रक नेमण्यात आले होते. याशिवाय सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक, विभाग नियंत्रक दीपक घोडे, यंत्र अभियंता पंकज डावरे, सहाय्यक वाहतूक अधीक्षक सरडे, तसेच महाड आगारप्रमुख रितेश फुल पगारे, स्थानक प्रमुख शिवाजी जाधव सज्ज होते. पार्किंग ठिकाण ते रायगड पायथा वाय जंक्शन इथपर्यंत अंदाजे नऊ किमीचा प्रवास एसटीद्वारे शिवभक्तांनी केला. साधारण १५,६७० फेऱ्या झाल्या व यातून सुमारे चार लाख ७० हजार शिवभक्तांनी प्रवास केला.

एसटीमुळे शिवराज्याभिषेक सोहळ्यात वाहतूक कोंडीचे विघ्न टाळता आले. एसटीच्या या दमदार कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

## इरसाल गडावरून पडून ट्रेकरचा मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

गिर्यारोहणासाठी आलेल्या वयोवृद्ध ट्रेकरचा पाय घसरून दरीत पडल्याने मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. १०) घडली. श्रीराम प्रभाकर मराठे (वय ६४, रा. पुणे) असे या ट्रेकरचे नाव असून ते तीन मित्रांसोबत खालापूर तालुक्यातील चौक येथील इरसालगडावर गिर्यारोहणासाठी आले होते.

श्रीराम मराठे यांना गिर्यारोहणाची आवड असल्याने अनेक गडांची माहिती होती. ते शनिवारी सकाळी इरसालगडावरील वरचा नेढा भागात ट्रेकिंग करीत असताना पाय घसरल्यामुळे ते २०० ते २५० फूट खोल दरीत पडले. या घटनेची माहिती त्यांच्यासोबत असलेल्या मित्रांनी पोलिसांना दिल्यानंतर त्यांच्या शोधमोहिमेसाठी निसर्ग मित्र पनवेल, यशवंती हायकर्स खोपोली आणि शिवदुर्ग मित्र मंडळ लोणावळा रवाना झाले. दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास श्रीराम यांचा मृतदेह दरीतून वर काढण्यात आला. याबाबत चौक पोलीस दूरक्षेत्र येथे नोंद करण्यात आली आहे.

## पनवेलमधील चहाविक्रेत्याचा केंद्र सरकारतर्फे दिल्लीत सत्कार

**पनवेल : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेंतर्गत कर्ज घेऊन त्याची परतफेड व्यवस्थितरित्या केल्याने रस्त्यावर चहा विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या पनवेलच्या रवींद्र मगर यांचा नुकताच केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयातर्फे दिल्लीत सत्कार करण्यात आला. या सत्काराने ते भारावून गेले आहेत.



सत्कार समारंभास केंद्रीय नगरविकासमंत्री हरदीपसिंग पुरी, प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधीचे सचिव मनोज जोशी, गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाचे सहसचिव राहुल कपूर, महाराष्ट्राच्या नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे उपायुक्त रोहिदास गुरुकुलकर, राज्य अभियानाचे व्यवस्थापक रवींद्र जाधव आदी उपस्थित होते.

बँकांकडून व्यवसायासाठी निगडित छोट्या-मोठ्या बाबी व गरजांसाठी सुलभतेने कर्ज मिळावे यासाठी केंद्र सरकारची प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना आहे. आतापर्यंत देशभरातील सर्व शहरांमध्ये व गावांमध्ये या योजनेतून बँकांमार्फत २८ लाख व्यापारी बंधू-भगिनींना कर्ज वाटप करण्यात आले आहे. याच योजनेतून चहा विक्रेते रवींद्र मगर यांनी पनवेलच्या बँक ऑफ इंडियामधून सर्वप्रथम १० हजार रुपयांचे कर्ज घेतले व त्याची परतफेड व्यवस्थित केली. हे कर्ज वेळेवर फेडल्याने त्यांना २० हजारांचे कर्ज पुन्हा देण्यात आले. त्याचीही ते नियमाप्रमाणे परतफेड करीत आहेत. यामुळे मगर यांची सत्कारासाठी निवड झाली. महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, मनपा प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर योजनेच्या अधिकारी विनया म्हात्रे, नवनाथ थोरात यांनी मगर यांचे नाव सुचविले होते.

> **भारत सरकारतर्फे दिल्ली येथे झालेला सत्कार हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय घटना आहे. या सत्कारामुळे आयुष्यातील माझा तो आनंदाचा, अभिमानाचा दिवस आहे. या वेळी व्यासपीठावरून मला व्यवसायाबाबत विचारपूसही करण्यात आली याचे मनस्वी समाधान वाटले.**
>
> **-रवींद्र मगर, चहाविक्रेते, पनवेल**

# बोगस बियाणे विकणाऱ्यांनो सावधान!

## ■ १० वर्षांची शिक्षा होणार; कृषीमंत्र्यांची घोषणा

**अकोला : प्रतिनिधी**

पेरणीच्या हंगामात शेतकऱ्यांना बोगस बियाणे देऊन त्यांची फसवणूक करण्यात येत असल्याच्या घटना घडतात. शेतकऱ्यांची बियाण्याच्या बाबतीत होणारी फसवणूक थांबवण्यासाठी आता शिंदे-फडणवीस सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे बोगस बियाणे विकणाऱ्यांना १० वर्षांची शिक्षा होणार असून यासाठी येत्या अधिवेशनात कायदा आणला जाणार असल्याची घोषणा कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी केली आहे. ते अकोल्यात एका कार्यक्रमात बोलत होते.



कृषीमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले की, ज्यांच्याकडे बोगस बियाणे, बोगस औषधे किंवा खते असतील त्यांनी ती तत्काळ नष्ट करावीत. अन्यथा राज्यपाल यांच्याकडे मी पूर्ण रिपोर्ट देणार असून त्यावर अंतिम निर्णय झाल्यावर बोगस माल विकणाऱ्यांवर किमान १० वर्षांची शिक्षा झाली पाहिजे असा कायदा येत्या अधिवेशनात आणला जाणार आहे.

शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी एक दिवस बळीराजासाठी हा उपक्रम आम्ही राबविला, ज्यात राज्यातील १६ हजार शासकीय कर्मचारी-अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. सकाळपासून रात्री झोपेपर्यंत शेतकऱ्यांना कोणत्या अडचणीचा सामना करावा लागतो याचा अभ्यास केला.

**विशेष पथकाची शिफारस**

*मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत चर्चा करून एक प्रस्ताव राज्यपाल यांच्याकडे घेऊन जाणार आहे. पोलीस, महसूल आणि कृषी विभाग या तिघांचे दोन महिन्यांसाठी विशेष पथक तयार करण्यात आले पाहिजे. यामुळे बोगसगिरी करणारे सर्व समोर येतील, असे कृषीमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले.*

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत आम्ही खरीप हंगामाची आढावा बैठक आयोजित केली होती. त्या वेळी अकोला, जालना, परभणी जिल्ह्यातील आमच्याकडे तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे आमच्या अधिकाऱ्यांनी ८७ ठिकाणी छापेमारी केली, ज्यात ६८ ठिकाणी अनियमितता आढळून आली, तर काही ठिकाणी अधिकारी पैसे घेत असल्याचे बातम्या आल्या. मी पोलिसांना फोन करून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. आमच्या कोणत्याही अधिकाऱ्याने पैसे घेतले असल्याचे आढळून आल्यास त्याची तक्रार जिल्हाधिकारी किंवा लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे करावी, असेही कृषीमंत्री सत्तार म्हणाले.

# कोकण रेल्वे मार्गावर पावसाळी वेळापत्रक लागू

**रत्नागिरी : प्रतिनिधी**



कोकण रेल्वे मार्गावर पावसाळी वेळापत्रक लागू झाले आहे. त्यामुळे गाड्यांचा वेग ४० किलोमीटर प्रतितास असेल. पावसाळ्यात प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी ही वेगमर्यादा करण्यात आली आहे.

कोकण रेल्वेने मान्सूनसाठी नवे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यानुसार सर्वच गाड्यांच्या वेळा बदलल्या आहेत. हे नवे वेळापत्रक १० जून ते ३१ ऑक्टोबरसाठी लागू असेल. या कालावधीत रेल्वेची वेगमर्यादा ४० ते ९० प्रतितास असणार आहे तसेच सर्वच धोकादायक ठिकाणी २४ तास गस्त असणार आहे. कोकण रेल्वेने ज्या कालावधीसाठी रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकात बदल केला आहे, त्या कालावधीत गणेशोत्सवसुद्धा येतो आहे. त्यामुळे वेळापत्रकातील कोकणवासीयांसाठी महत्त्वाचे आहे. मुंबई ते मंगलोर ही गाडी सीएसएमटी येथून रात्री १०.०२ वाजता सुटून ठाण्यात १०.४५ वाजता, रत्नागिरी पहाटे ४.१०, कणकवली सकाळी ६.१० वाजता, मंडगावला ८.५०, तर मंगळूरला दुसऱ्या दिवशी दुपारी ३.४० वाजता पोहचेल. परतीसाठी मंगळूर येथून सायंकाळी ४.३५ वाजता सुटून मंडगावला रात्री १० वाजता, कणकवली रात्री ११.५१, रत्नागिरी मध्यरात्री २.२५, ठाणे सकाळी ९.४० तर सीएसटीएमला सकाळी १०.३५ वाजता पोहचेल.

कोकण कन्या एक्स्प्रेस मुंबई सीएसटी येथून रात्री ११.५ वाजता सुटेल. दादरला ११.२०, ठाणे ११.५०, रत्नागिरी पहाटे ५.३०, वैभववाडी सकाळी ७.०६, कणकवली ७.४०, सिंधुदुर्ग ७.५७, कुडाळ ८.१०, सावंतवाडी ८.४२ वाजता पोहचेल. परतीसाठी मडगाव येथून सायंकाळी ६ वाजता सुटून सावंतवाडीला ७.३०, कुडाळ ७.५२, सिंधुदुर्गनगरी ८.०४, कणकवली ८.५६, रत्नागिरी १०.५५, ठाणे पहाटे ४.२२ , दादर ५.१२, सीएसटीएमला ५.४० वा. पोहचेल.

सावंतवाडी दादर तुतारी एक्स्प्रेस दादर येथून मध्यरात्री १२.०५ सुटून ठाण्याला १२.३५, रत्नागिरीला सकाळी ७.५०, वैभववाडी ९.३०, कणकवली १०.१६, सिंधुदुर्ग १०.३८, कुडाळ १०.५२ तर सावंतवाडीला ११.३० वा. पोहोचेल. परतीसाठी सायंकाळी ५.५५ वाजता सुटून कुडाळ ६.१४,सिंधुदुर्ग ६.२६, कणकवली ६.४६, वैभववाडी ७.२०, दादरला सकाळी ६.४० वाजता पोहचेल.

तेजस एक्स्प्रेस मुंबईहून ५.५० वाजता पहाटे सुटून दादर ६.०२, ठाणे ६.२५, रत्नागिरी ११.५०, कुडाळ २.३२ वाजता पोहचेल. परतीसाठी मंडगाव येथून दुपारी १२.२५ वा. सुटून कुडाळला दुपारी २.०० रत्नागिरी ५.२५ दादरला ११.३० वा. पोहोचेल

दिवा-सावंतवाडी ही गाडी दिवा येथून सकाळी ६.२५ वाजता सुटून रत्नागिरी येथे दुपारी २ वाजता, वैभववाडी ३.५५, कणकवली ४.३४, कुडाळ ५.११ तर सावंतवाडीला ६.३० वा. पोहचेल. परतीसाठी सकाळी सावंतवाडी येथून ८.१५ वाजता सुटून कुडाळ ८.३८, कणकवली ९.१०, वैभववाडी ९.५५, रत्नागिरी १२.५ तर दिवा रात्री ८.१० वा. पोहचेल.

मांडवी एक्स्प्रेस मुंबईतून सकाळी ७.१० वा. सुटून दादर ७. २५,ठाणे ७.५५, रत्नागिरी २.४०, वैभववाडी ४.५८, कणकवली ५.३२, कुडाळ ६.१६, सावंतवाडी ७.०२ मडगावला रात्री ९.४५ वा पोहचेल. मुंबईकडे जाताना मडगाव येथून सकाळी ८.३० वाजता सुटून सावंतवाडीला १० वाजता, कुडाळ १०.२२, सिंधुदुर्ग १०.३८, कणकवली ११.००, वैभववाडी ११.३०, रत्नागिरी दुपारी २, ठाण्याला रात्री ८.३७, तर दादरला ९.०७ वा पोहचेल. याचबरोबर लांब पल्ल्यांच्या गाड्यांच्या वेळापत्रकातही बदल करण्यात आला आहे.

# वादळी वाऱ्यामुळे पश्चिम रेल्वेला फटका

### पोल पडून वाहतूक सेवा विस्कळीत

**पालघर : प्रतिनिधी**

विरार-वैतरणा रेल्वेस्थानकांदरम्यान वादळी वाऱ्यामुळे ओव्हरहेड वायरचे पोल तुटल्याची घटना शनिवारी (दि. १०) दुपारी घडली. त्यामुळे पश्चिम रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती.





मिळालेल्या माहितीनुसार बिपरजॉय चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी रात्रीपासूनच वादळी वारा सुरू झाला होता. त्याचा फटका रेल्वेलादेखील बसला आहे. पश्चिम रेल्वेच्या विरार व वैतरणा रेल्वेस्थानकांदरम्यान शनिवारी दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यामुळे विजेचा पोल पडला.

वैतरणा आणि विरारच्यामध्ये वाढीव कसराळी येथे नवीन ट्रॅकचे काम सुरू आहे. या ठिकाणी चालू ट्रॅक्टर पोल पडल्याने पश्चिम रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली. लोकल, मालगाड्या, लांब पल्ल्याच्या ट्रेनसेवांवर याचा परिणाम झाला. या घटनेआधी जोधपूर एक्स्प्रेस गेल्याने अनर्थ टळला.

## अभिनेत्री स्नेहल राय बचावली

**पुणे** : 'इश्क का रंग सफेद' फेम अभिनेत्री स्नेहल रायच्या गाडीचा अपघात झाला आहे. पुण्याच्या दिशेने जात असताना एका भरधाव ट्रकने तिच्या कारला धडक दिली. कारचालकाने प्रसंगावधान राखून गाडी वळवल्याने आतील सर्वांचा जीव वाचला आहे.

स्नेहल राय व तिचा चालक यांना गाडीतून सुखरूप बाहेर काढण्यात आले. या अपघातात कारमधील कोणीही गंभीर जखमी झाले नाही, पण गाडीचे नुकसान झाले. अपघातानंतर ट्रकचालक पसार झाला. स्वत: स्नेहलने अपघाताची माहिती जवळच्या पोलीस ठाण्यात फोन करून दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहचले, असे तिने सांगितले.

# नवी मुंबईत आज अल्प दाबाने पाणीपुरवठा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या मोरबे धरणातून शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण शहरात रविवारी (दि. ११) अल्प दाबाने पाणीपुरवठा होणार असल्याची माहिती अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील यांनी दिली.

नवी मुंबई महापालिकेच्या स्वतःच्या मालकीच्या मोरबे धरणातून नवी मुंबईसह सिडको क्षेत्रातील विभागांना पाणीपुरवठा करण्यासाठी दोंन हजार २४ मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आली आहे. ही जलवाहिनी जुनी झाली असल्याने शनिवारी (दि. १०) या सकाळी आदई गावाजवळ फुटली.

जलवाहिनी फुटल्याची माहिती मिळताच मोरबे धरणाच्या जवळील जलशुद्धीकरण केंद्रातून शहरातील भुस्तरीय आणि उच्चस्तरीय जलकुंभांना चालू असलेला पाणीपुरवठा त्वरित बंद करण्यात आला. त्यामुळे शनिवारी संध्याकाळी होणारा पाणीपुरवठा झाला नाही. तातडीने ही जलवाहिनी दुरुस्तीचे काम चालू करण्यात आले. हे काम रात्रीपर्यंत पूर्ण होऊन रविवारी सकाळी संपूर्ण शहरात दिवसभर अल्प दाबाने पाणीपुरवठा होणार आहे, अशी माहिती पाटील यांनी दिली. या विषयी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कळंबोली येथे आज महाआरोग्य शिबिर

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या वतीने गरीब, गरजू नागरिकांना दिलासा देताना तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी आणि उपचार मिळावे या उद्देशाने रविवारी (दि. ११) कळंबोली सेक्टर १ ई येथील नवीन सुधागड हायस्कूलमध्ये मोफत महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात सकाळी १० ते सायंकाळी ४पर्यंत विविध निष्णांत डॉक्टरांमार्फत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, कान-नाक-घसा तपासणी करण्यात येतील. तपासणीदरम्यान आढलेल्या रुग्णांना इन्जिप्लास्टी, इन्जोग्राफी, मोतीबिंदू, किडनी स्टोन अशा शस्त्रक्रियांसाठी, औषधोपचारांसाठी मदत करण्यात येईल. गरजूंना मोफत चष्मे वाटप करण्यात येतील, अशी माहिती आयोजकांनी दिली.

# कोकण किनारा मच्छीमार संघटनेची उरणमध्ये स्थापना

**उरण : वार्ताहर**

जेएनपीटी कामगार वसाहतीच्या बहुद्देशी सभागृहात आयोजित मच्छीमार मेळाव्यात सीआयटीयुच्या अखिल भारतीय अध्यक्ष कॉ. के हेमलता यांच्या प्रमुख उपस्थितीत सेंटर ऑफ इंडियन ट्रेड यूनियन्स (सीआयटीयु)च्या नेतृत्वातील कोकण किनारा मच्छीमार संघटनेची स्थापना करण्यात आली.





कोकणच्या समुद्र किनाऱ्यावर यांत्रिक व पारंपरिक आशा दोन्ही पद्धतीने मासेमारी केली जाते. तसेच याच किनारपट्टीवरील शेतकरी हा खोल समुद्रात जीव धोक्यात घालून मासेमारी करीत आहे. या श्रमिक व कष्टकरी मच्छीमारांच्या अनेक समस्या आहेत. आशा अनेक वर्षे आपल्या हक्कापासून वंचीत मच्छिमारांच्या समस्या देश पातळीवर असलेल्या सीआयटीयुच्या मच्छीमार संघटनेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी सिटूच्या झेंड्याखाली मच्छीमारांना संघटीत करण्यात येत आहे.

मच्छींमारांना न्याय मिळवून देण्यासाठी कोकण किनारा मच्छिमार संघटना स्थापन करण्यात आली आहे. या मेळाव्याला सिटुचे महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी एम. एच.शेख, जेएनपीटीचे माजी विश्वस्त कॉ. भूषण पाटील, फॉरवर्ड सिमेन्स यूनियनचे अध्यक्ष मनोज जाधव, रायगड जिल्हाध्यक्ष मधूसूदन म्हात्रे, या मेळाव्याचे प्रमुख संघटक व सिटूचे नेते कॉ. संदीप पाटील,के.आर. रघु यांनी मार्गदर्शन केले. मेळाव्यासाठी सुरेश कोळी, मारुती पाटील, दिलीप पाटील काशिनाथ पाटील यांनी मेहनत घेतली. मेळाव्यासाठी रायगड जिल्ह्यातील शेकडो मच्छीमार महिला व पुरुष उपस्थित होते.

# वलप गणेश नगर रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील वलप गणेश नगर नागरिकांना खड्ड्यातून रस्ता काढावा लागत आहे. येथील रस्त्याची दुरवस्था झाली असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी समाजसेवेत सक्रिय असलेले भाजपचे कार्यकर्ते किरण पाटील यांनी ग्रामस्थांच्या वतीने पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



वलप गणेशनगरसाठी एकमेव असलेला रस्ता खड्ड्यांत गेला असून या रस्त्यावरून चालताना शारिरीक त्रास होत आहे.

पावसाळी हा रस्ता पाण्याखाली जात असल्याने ये-जा करणे धोक्याचे होत असते. तळोजा औद्योगिक विभागसाठी हा रस्ता पैसा व वेळ वाचविणारा असल्याने या रस्त्याचा जास्त वापर होत आहे. या गावात स्वयंभू गणेशाचे मंदिर असल्याने गणेशभक्तांची रस्त्यावर सतत वर्दळ चालू असते. अशा या हा गणेशनगर आणि एमआयडीसी यांना जोडणाऱ्या रस्त्याची दूरवस्था झाली आहे. रस्त्यावर चालणे मुश्किल झाले आहे. याचा सहनभुतीपूर्वक विचार करून रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी किरण पाटील यांनी केली आहे

# छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीची शैक्षणिक सहल

**उरण : बातमीदार**

छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटी पनवेलच्या वतीने कायद्याचे विद्यार्थी यांची शैक्षणिक सहल दिल्ली संसद भवन, राष्ट्रपती भवन, सुप्रीम कोर्ट येथे नेण्यात आली. या वेळी विद्यार्थी यांना संसदेत लोकसभा राज्यसभा सेंट्रल हॉल यांचे कामकाज कसे चालते याविषयी उपयुक्त माहिती देण्यात आली.





या सहलीमध्ये ३८ विद्यार्थ्यांचा समावेश होता. राष्ट्रपती भवन संग्रहालय येथे विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बनवलेली राज्यघटना, त्यासाठीची कमिटी, आजपर्यंतच्या राष्ट्रपती यांची कारकीर्द, स्वातंत्र्य संग्रामातील चलचित्र, थ्रीडी शो दाखविण्यात आला. यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्य काळातील योगदान चलचित्रातून दाखविण्यात आले. विविध तैलचित्र राष्ट्रपती भवन येथे ठेवण्यात आली आहेत. राष्ट्रपती भवन येथील अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती सांगितली. त्याचबरोबर भारताचे सर्वोच्च न्यायालय येथे भेट देण्यात आली. याशिवाय ऐतिहासिक वास्तू, लाल किल्ला, कुतुब मिनार, अक्षरधाम, आगरा येथील ताजमहाल, आगरा फोर्ट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

या शैक्षणिक सहलीने विद्यार्थी यांना देशातील संविधानिकदृष्ट्या असलेली सर्वोच्च स्थाने पाहता आली तसेच ऐतिहासिक वास्तूंविषयी माहिती मिळाली.

या सहलीसाठी रजिस्ट्रार डॉ. आर. पी. शर्मा, डॉ. मिश्रा, डॉ. भानू, डॉ. साखरे, डॉ. पंकज, अनिकेत यांनी मार्गदर्शन केले.

# उसाच्या रसाला मागणी वाढली

**उरण : वार्ताहर**

दिवसेंदिवस वातावरणातील उष्णता वाढल्याने शरीराची लाही लाही होत आहे. अशा वेळी थंडावा मिळावा या उद्देशाने शीतपेयासह थंडगार फळांच्या रसांना मागणी वाढत आहे. त्यामुळे अनेक जण उसाचा रस पितात. उरण शहरात ठिकठिकाणी उसाच्या रसाची दुकाने आहेत.

उरण शहरातील जुना एसटी बसथांबा, पालवी हॉस्पिटलजवळ असलेले नवनाथ रसवंतीगृह हे ७० वर्षांपूर्वीचे असल्याने येथे दुपारच्या वेळेस खूपच गर्दी असते. नैसर्गिक व शरीरारा थंडावा देणारे, उर्जादायक, गुणकारी असलेले पेय आम्ही विकतो, असे नवनाथ रसवंतीगृहाच्या भारती दिलीप सोंडकर यांनी सांगितले.



## दुखवटा



**बयवबाई पाटील**

**पेण** : पेण तालुक्यातील दादर गावच्या रहिवासी बयवबाई काळू पाटील यांचे वयाच्या १००व्या वर्षी निधन झाले आहे. त्या पत्रकार विनायक पाटील यांच्या आजी होत्या. त्यांना आध्यात्मिक व धार्मिक कार्याची आवड होती. दादर परिसरात होणाऱ्या विविध कार्यक्रमात त्यांचा सहभाग असे. त्यांच्या पश्चात मुले, सुना, मुली, जावई, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. कै. बयवबाई यांचा दशक्रिया विधी आणि उत्तरकार्य २० जून रोजी दादर येथे होणार आहे.

# जितेंद्र आव्हाडांवर कारवाई करा

## भाजप महिला मोर्चाची मागणी; पनवेल पोलिसांना दिले निवेदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष महिला मोर्च्याच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या संदर्भात राष्ट्रवादीचे नेते तथा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी ट्विटर मजकूर लिहून चित्रा वाघ यांची मानहानी आणि बदनामी करण्याचा प्रकार केला आहे. या संदर्भात पनवेल भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या वतीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांना शनिवारी (दि. १०) निवेदन देण्यात आले. या निवेदनात जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

भाजप महिला मोर्चाच्या प्रतिनिधी समाजात महिला सबलीकरण करण्याचे तसेच सामाजिक आर्थिक स्तरावर महिलांना सक्षम करण्याचे काम करत आहेत. जिथे जिथे महिलांवर अन्याय होतो तिथे महिला मोर्चा आवाज उठवतो, पण सध्या प्रदेश महिला मोर्चा अध्यक्षा चित्रा वाघ यांचे चारित्र्यहनन करण्याचा प्रकार राष्ट्रवादीचे मुंब्रा मतदार संघाचे आमदार जितेंद्र आव्हाड करत आहेत. हे पाहता एक महिला म्हणून आम्ही शांत बसू शकत नाही. आव्हाड यांनी ९ जून रोजी रात्री १२ वाजून ५३ मिनिटांनी चित्रा वाघ यांच्या संदर्भात बदनामकारक मजकूर ट्विटरवर अपलोड केला आहे. चित्रा वाघ यांची मानहानी करण्याचा त्यांना बदनाम करण्याचा त्यांच्या कुटुंबाला मानसिक त्रास देण्याचा आणि सामाजिक जीवनातून उठविण्याचा प्रकार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

जिजाऊ, सावित्री बाई फुले यांच्या महाराष्ट्रात महिलांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले जात आहेत हे सहन केले जाणार नाही. म्हणून महिला नेत्या चित्रा वाघ यांची ट्विटरवरून बदनामी मानहानी केल्याप्रकरणी आणि बदनामकारक मजकूर ट्विटरवर टाकल्याप्रकरणी जितेंद्र आव्हाड यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदन देतेवेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर तथा महिला मोर्च्याच्या जिल्हा उपाध्यक्ष चारुशीला घरत, पनवेल शहर अध्यक्षा वर्ष नाईक, माजी नगरसेविका नीता माळी, शहर उपाध्यक्ष नीता मंजुळे, स्मिता मराठे, ज्योस्त्ना माळी आदी उपस्थित होते.

# पनवेल महापालिका नव्या मुख्यालयाच्या इमारत आरेखनाला आंतरराष्ट्रीय पुरस्कार



**पनवेल : प्रतिनिधी**

इंटरनॅशनल प्रापॅर्टी अॅण्ड ट्रॅव्हलच्यावतीने थायलंड येथे नुकतीच आंतरराष्ट्रीय स्तरावरील आरेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत 'बेस्ट पब्लिक सर्व्हिसेस आर्किटेक्चर इंडिया' या गटामध्ये हितेन सेठी आर्किटेक्चरच्या वतीने सादर करण्यात आलेल्या पनवेल महापालिकेच्या नव्या मुख्यालयाच्या आरेखनाला पाच स्टार मानांकनांबरोबर एशिया पॅसिफिक प्रॉपर्टी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

इंटरनॅशनल प्रापॅर्टी अॅण्ड ट्रॅव्हलच्या वतीने दरवर्षी विविध देशामध्ये आशिया खंडातील विविध देशातील लोकपयोगी सेवा देणाऱ्या वेगवेगळ्या इमारतीच्या आरेखनांची स्पर्धा आयोजित करण्यात येते. यावर्षीची स्पर्धा थायलंड येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत आशिया खंडातील विविध देशातील वास्तू विशारदांनी सहभाग घेऊन आपली आरेखने सादर केली होती. या स्पर्धेमध्ये हितेन सेठी आर्किटेक्चरच्यावतीने पनवेल महापालिकेच्या नव्या मुख्यालयाचे आरेखन सादर करण्यात आले होते. या आरेखनाला पाच स्टार मानांकनांबरोबर एशिया पॅसिफिक प्रॉपर्टी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याचबरोबर एशिया पॅसिफिक रिजन पुरस्कारासाठीदेखील या आरेखनाला नामांकन प्राप्त झाले आहे.

या पुरस्कारामुळे पनवेल महापालिकेची नवी इमारत ही आंतरराष्ट्रीय पुरस्कार पुरस्कार मिळवणारी महाराष्ट्रातील महापालिकेची एकमेव इमारत आहे.

सहा मजली महापालिकेच्या या नव्या मुख्यालयामध्ये २२४ आसन क्षमतेचे एक मुख्य सभागृह, एक बहुद्देशिय हॉल, समिती सभागृह, टेरेसवरती आर्ट गॅलरी असणार आहे. ही इमारत जास्तीत जास्त टिकाऊ बनविण्यावरती हितेन सेठी आर्किटेक्चरच्या वतीने भर देण्यात आला आहे.

या पुरस्काराबद्दल आयुक्त गणेश देशमुख यांनी मुख्यालयामध्ये हितेन सेठी यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. या वेळी उपायुक्त सचिन पवार, शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, एचएसए कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

### तळमजल्याचे काम पूर्ण

*महापालिकेच्या नूतन मुख्यालयाच्या तळमजल्याचे काम पूर्ण झाले असून येत्या काही दिवसांत इमारतीच्या पहिल्या मजल्याचा स्लॅब टाकण्यात येणार आहे. महापालिकेची नव्या इमारत प्रत्यक्षात आणण्यासाठी शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर आणि संपुर्ण तांत्रिक टीम अथक परिश्रम घेत आहे.*



**पनवेल : भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उरणसाठी प्रमुखपदी तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने रायगड जिल्हा परिषद नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी निवड झाली आहे. त्याबद्दल माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, उपसरपंच गणेश पाटील, माजी सरपंच राजेंद्र भालेकर, तंटामुक्ती अध्यक्ष राघो पाटील आदींनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# उरण नगर परिषदेत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर, बातमीदार**

उरण नगर परिषदचे माँसाहेब मिनाताई ठाकरे वाचनालय येथे कोकण विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर यांची संकल्पना आणि उरण नगर परिषदचे मुख्याधिकारी राहूल इंगळे यांचे मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल संतोष पवार यांच्या वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



एमपीएससी, तलाठी भरती, वन रक्षक भरती या स्पर्धा परीक्षे संदर्भात राजेंद्र हनुमंत गायकवाड, सहाय्यक निबंधक गृहनिर्माण संस्था, उरण यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाचे वैशिष्ट्य असे की, सुरुवातीपासून शेवटपर्यंत सहभागी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त कृतीयुक्त सहभाग घेतला. त्यामुळे व्याख्याते आणि विद्यार्थी यांनी समाधान व्यक्त केले. या शिबिरानिमित्त लाभलेले मुख्य व्याख्यात राजेंद्र हणमंत गायकवाड, सहाय्यक निबंधक, उरण यांना ग्रंथपाल संतोष पवार आणि ग्रंथालय सहाय्यक जयेश वत्सराज गजानन जुवेकर आणि उपस्थित विद्यार्थी यांच्या हस्ते झुंज क्रांतीवीरांची हे पुस्तक आणि कुंडीसह रोपटे देवून सन्मानित करण्यात आले.

याच वेळी उरण तालुक्यातील महिला पोलीस म्हणून ज्यांची निवड झाली त्या मिनल जयेश घरत आणि निकीता पिंगळे आणि उपस्थित विद्यार्थ्यांनमध्ये युक्ती सुनील भोईर (कोटनाका, उरण) हिला दहावीला ९३ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

उपस्थित विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहून स्पर्धा परीक्षांकडे निश्चित आपल्या भागातील विद्यार्थ्यांचा वाढतो आहे, हे समाधान ग्रंथपाल संतोष पवार यांनी व्यक्त करताना आज उरण नगरपरिषदचे मुख्याधिकारी राहूल इंगळे यांच्या सहकार्याने बहुतांश स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी पुस्तके मॉसाहेब मिनाताई ठाकरे वाचनालय, उरण येथे आपलब्ध आहेत, या बाबतही माहिती देण्यात आली.

# चिरनेर येथील शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथे घेण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या कार्यशाळेत गुरुवारी (दि. ८) खरीप हंगामातील भात पिकांच्या व अन्य पिकांच्या लागवडी नियोजन संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.



महाबीज कंपनीच्या कृषी क्षेत्र अधिकारी प्राची मोराळे यांच्या मुख्य उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात कृषीक्षेत्र अधिकारी प्राची मोराळे यांनी, शेतकऱ्यांनी महाबीज कंपनीचे पेरणीसाठी बियाणे घेतले आणि भात पीक आल्यानंतर हे भात, महाबीज कंपनीला शेतकऱ्यांनी दिले, तर महाबीज कंपनी हमीभावापेक्षा २० टक्के अधिक दराने शेतकऱ्यांचे हे भात खरेदी करेल, असे त्यांनी या वेळी स्पष्ट करून ग्रामबिजोउत्पादनाचे महत्त्व विशद केले.

कृषी पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे यांनी प्रात्यक्षिक आणि सुधारित भात लागवड पद्धतीचा शेतकऱ्यांनी अवलंब केला पाहिजे, असे सांगितले. कृषी सहाय्यक अधिकारी निखिल देशमुख व सुरज घरत यांनी २०२३च्या खरीप हंगामातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या योजना आहेत, त्याचा लाभ घेण्यासाठी आवश्यक लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती देऊन, पंतप्रधान किसान सन्मान योजनेसाठी इ-केवायसी आधार सीडिंग बँक के वाय सी करून, घेण्याचे आवाहन त्यांनी या वेळी शेतकऱ्यांना केले.

या वेळी सर्पमित्र जयवंत ठाकूर आणि अनिकेत ठाकूर यांनीही मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना, आत्मा अंतर्गत भाजीपाला प्रात्यक्षिक किटचे वाटप करण्यात आले. या वेळी चिरनेर गावचे पोलीसपाटील संजय पाटील व कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.



**उलवे नोड : भारतीय जनता पक्षाच्या सेक्टर १७ येथील कार्यालयात आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, सुधीर ठाकूर, भाऊ भोईर, संदीप म्हात्रे, कमलाकर घरत, आशिष घरत, मधुकर पाटील, अनंता ठाकूर आदी उपस्थित होते.**

# पनवेल शासकीय अध्यापक विद्यालयात वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासकीय अध्यापक विद्यालय ही महाराष्ट्रातील एक नामाकित शासकीय अध्यापक विद्यालय आहे. या विद्यालयास या वर्षीचा ग्रीन कम्पस अवार्ड मिळाला आहे. महाविद्यालय प्राचार्य रमा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी बुधवारी (दि. ७) वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित केला.

जागतिक पर्यावरण दिनी सर्व शिक्षकांनी प्रत्येकाच्या शाळेत वृक्षारोपण केले. आपण ज्या संस्थेत शिक्षण घेत आहोत, तेथे वृक्षारोपण करून पर्यावरणास मदत करणे आपले आद्य कर्तव्य आहे, ही भावना ठेवून शासकीय महाविद्यालय पनवेल येथे प्रथम वर्ष बी. ऍड च्या ४२ विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. एक विद्यार्थी, एक किंवा दोन झाडे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले. प्रत्येक झाडाची कुंडीत खत घालून लागवड करण्यात आली.

या वेळी पेट्रा करोटन, बोगनवेल, जास्वंद, गुलाब, मोरपंखी, कन्हेरी, मिरची, जुई, एलोवेता, फायकस, जसुपा, अकझोडा, फायकस, ख्रिसमस, महात्म ड्रेगेना आदी झाडाची लागवड करण्यात आली. प्रथम प्राचार्य रमा भोसले, केंद्र समन्व्यक निलिमा मोरे, बिजली दंडपे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्रत्येक कुंडीवर झाडाचे नाव, शिक्षकांचे नाव टाकण्यात आले. यामुळे हे माझे झाड, याची मला काळजी घ्यावी लागणार ही भावना जपली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी राजेंद्र नाईक, स्मिता म्हस्के, विनोद म्हात्रे, दिलीप पाटील, सुप्रिया पाटील, प्रमोद घुगे, योगिता पाष्टे, अनिल पाटील, राजेंद्र पाटील, दीपक तुरे, सुरेश पाटील, संजय नागरे, पूजा रणपिसे, उजवला बोरोले, अवधूत पवार, अनिल कदम, संध्या कासारे, प्रमिला गावड, संजय राठोड, सीमा बदडे, सुजाता जोशी आदी शिक्षकांनी विशेष सहकार्य केले.

# कळंबोलीत वह्यांचे मोफत वाटप

## रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

रामदास शेवाळे प्रतिष्ठान व शिवसेना कळंबोली पदाधिकारी आयोजित शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत वह्या वाटप कार्यक्रम श्री दत्त कृपा अपार्टमेंट केएल २ येथे सुरू करण्यात आला.

या वेळी गरजू शाळकरी विद्यार्थ्यांना वह्या वाटण्यात आल्या व ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात व स्पर्धा परीक्षा मध्ये उत्कृष्ट कामगिरी केली अश्या विद्यार्थ्यांचा सन्मान या ठिकाणी करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस मार्गदर्शनदेखील दिले गेले.

या वेळी शिवसेनेचे कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, शहर संघटक आनंदा माने, विभाग संघटक सुखदेव सस्ते, विभाग प्रमुख दीपक कोडवते, रणजित फडतरे, अतुल तरंगे व रामदास शेवाळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत फाळके, विराट पवार, सुधीर ठोंबरे, सुभाष घाडगे, वैभव लोंढे, दादा तुपे. तसेच अपार्टमेंट मधील संजय खरात, संदीप शिंगाडे, स्वप्नील लवळे, सागर जाणकार, राहुल ढेंबरे, शरद मोहिते, सुरेश लवळे, जितेंद्र जाधव, अजित धुमाळ, दीपक माने, संतोष कानडे व इतर कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.





# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वृक्षारोपण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १०) स्टाफ वेल्फेअर कमिटी व नेचर्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.

संपूर्ण जगामध्ये पाच ५ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो तसेच या दिवशी विविध ठिकाणी वृक्ष लागवड केली जाते तसेच पर्यावरणाचा संतुलन राखण्यासाठी विविध उपक्रम घेतले जातात या अनुषंगाने रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयात प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी वृक्षारोपण केले.

या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) हे सर्व उपस्थित होते. या वृक्षारोपणाचे आयोजन प्रा. डॉ. धनवी आवटे यांनी केले तसेच प्रा. सफीना मुकादम, डॉ. फारुख शेख व प्रा. प्रथमेश उदेकर यांनी सहकार्य केले.

**कळंबोली : राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मधुकर जाटोद यांचा वाढदिवस माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा यांच्या पक्ष कार्यालयात साजरा झाला. या वेळी अजित पवार, आबा घुटूकूडे, प्रकाश शेलार, विलास किठे आदी उपस्थित होते.**



आपल्या गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकीने त्यांनी आपले आदर्श व्यक्तीमत्व असे वेगळे स्थानही निर्माण केले आहे. असे असूनही त्यांना आपल्या देशातील चित्रपटसृष्टीसाठीचा अतिशय मानाचा आणि महत्वाचा असा हा पुरस्कार सुलोचनादिदीना दिला गेला नाही. अमिताभ बच्चन, आशा पारेख आणि रजनीकांत यांना हा पुरस्कार प्राप्त झाला तेव्हा सुलोचनादिदींना डावलल्याची भावना व्यक्त झाली.

सुलोचनादिदी असं म्हणताक्षणीच डोळ्यासमोर येते ती मराठी चित्रपटातून जपलेल्या मराठमोळ्या संस्कृतीचे प्रतिक! एक आदर्श मूर्ती! नायिका म्हणून रुपेरी कारकिर्द सुरु केल्यावर मग ताई, वहिनी, आई, आजी असा खूपच मोठा प्रवास त्यांनी अनुभवला. वात्सल्य मूर्ती हा एकच शब्द त्यांच्या कार्यकर्तृत्व आणि प्रतिमा यासाठी परफेक्ट ठरतो. सुलोचना यांचे मूळ नाव रंगू दीवाण. कोल्हापूरजवळच्या खडकलाट या खेड्यात त्यांचा ३० जुलै १९२९ रोजी जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना चित्रपट पाहण्याची विशेष आवड होती. मा. विनायक यांना एकेकाळी शिकवलेल्या शिक्षकांशी या रंगूच्या वडिलांचा परिचय होता. त्यांच्या ओळखीने रंगूला मा. विनायक यांच्या 'प्रफूल पिक्चर्स' या कंपनीत प्रवेश मिळाला. मा. विनायक यांनी रंगूला 'चिमुकला संसार' या चित्रपटात छोटीशी भूमिका दिली. रंगूची भाषा, खेडवळपणा यामुळे स्टुडिओतील लोक त्यांची थट्टा करायचे. प्रफुल्ल पिक्चर्सचा मुक्काम कोल्हापूरवरुन मुंबईला हलला तेव्हा त्या कोल्हापुरातच भालजी पेंढारकर यांच्या प्रभाकर स्टुडिओत दाखल झाल्या. १९४६ मध्ये प्रभाकर पिक्चर्सच्या 'सासूरवास' या चित्रपटात भूमिका साकारली. तर 'करीन ती पूर्व' या नाटकाच्या वेळी भालजीनी त्यांचे नाव 'सुलोचना' असे केले. आणि मग १९४७ साली त्या 'जय भवानी' या चित्रपटात नायिका झाल्या आणि त्यांची अभिनेत्री म्हणून वाटचाल आकार घेऊ लागली. त्यांचे करिअर हळूहळू घडू लागली. भालजी पेंढारकर यांच्या अतिशय शिस्तबद्ध काम आणि प्रशिक्षणातून 'सुलोचना' हे प्रातिनिधिक नाव झाले. त्यानंतर त्यांनी त्यांनी अनेक प्रकारच्या व्यक्तिरेखा साकारल्या. कधी गरीब शेतकरी कष्टकरी शेतकरीची पत्नी तर कधी ब्राह्मणाच्या संसारात कोंड्याचा मांडा करणारी स्त्री, तर कधी राजघराण्याच्या, मराठा सरदारातील घराण्याचा आब राखून असलेली करारी स्त्री, कधी प्रेमळ पत्नी तर कधी वात्सल्य मूर्ती! केवढी तरी विविधता त्यांनी दाखवली. 'तारका' आणि 'भाऊबीज' या चित्रपटात त्यानी आपल्या या प्रतिमेपेक्षा वेगळी भूमिका साकारली, पण रसिकांना ती अजिबात आवडली नाही. एकाद्या कलाकाराबाबत असेही घडू शकते आणि तो एकूणच वाटचालीतील एक भाग असतो.

सुलोचना म्हटल्यावर वहिनींच्या बांगड्या, प्रपंच, मोलकरीण, एकटी या चित्रपटातील भूमिका आवर्जून आठवायला हवेच. त्या चित्रपटाच्या प्रतिमेच रसिकांनी त्यांना पाहणे पसंत केले. ते चित्रपट तीच त्यांची ओळख झाली. त्यांनी मीठभाकर, मोठी माणसं, शिलंगणाचे सोने, देव पावला, जोहार मायबाप, बाळा जो जो रे, चिमणी पाखरं, सतीची पुण्याई, मराठा तितुका मेळवावा, एकटी, दूधभात, स्त्री जन्मा तुझी ही कहाणी, वहिनीच्या बांगड्या, अन्नपूर्णा, महाराणी येसूबाई, ओवाळणी, मी तुळस तुझ्या अंगणी, भाऊबीज, सुखाचे सोबती, आकाशगंगा, पतिव्रता, पंचारती, भाव तेथे देव, प्रपंच, छोटा जवान, फकिरा, मोलकरीण, अशा अनेक चित्रपटांत भूमिका साकारल्या. सुलोचनादिदींचा पहिला रौप्यमहोत्सवी यशस्वी चित्रपट ठरला तो 'जिवाचा सखा' (१९४८). जयराम शिलेदार हे या चित्रपटात त्यांचे नायक होते. तसेच भालजी पेंढारकर यांच्या 'मीठ भाकर' या चित्रपटानेही रौप्यमहोत्सवी यश संपादले. विशेष म्हणजे या चित्रपटाचे नायक चंद्रकांत मांडरे यांच्यासोबत सुलोचनादिदीनी तब्बल ४६ चित्रपटात भूमिका साकारली. तर 'वहिनीच्या बांगड्या' या चित्रपटाच्या यशाने त्या लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचल्या. त्यांच्या कारकिर्दीतील हा सर्वात मोठा आनंदाचा क्षण होता.

मराठी चित्रपटाच्या निमित्ताने पुणे शहरात येणे वाढल्याने त्या बहुश्रुत झाल्या. ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, पु. भा. भावे, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर आदि मातब्बर मराठी साहित्यिकांची पुस्तके वाचल्यावर त्यांच्या भाषेत शहरीपण आले. भालजी पेंढारकर यांनी त्यांना ही वाचनाची गोडी लावली. त्यामुळे त्यांची भाषा सुधारत गेली आणि त्याचा त्यांना बराच फायदा होऊ लागला. कलाकार अशा पध्दतीने घडत जात असतो.

'प्रपंच' या चित्रपटातील गावातील एका कुंभारणीच्या भूमिकेसाठी सुलोचनादिदींना निर्मात्याकडून नेसण्यासाठी नवीन साड्या देण्यात आल्या, पण यामुळे ही भूमिका योग्य वठणार नाही असे त्यांना अतिशय प्रामाणिकपणे वाटल्याने त्यांनी त्या साड्या गावातील गरीब बायकांना दिल्या आणि त्यांच्याकडील जुन्या, जीर्ण साड्या घेऊन त्या नेसल्या. यामुळेच आपण या चित्रपटातील व्यक्तिरेखेला न्याय देऊ शकू असा त्यांना विश्वास होता आणि झालेही तसेच. यात त्यांची कलेसाठी कला अशी बांधिलकी दिसते.

सुलोचनादिदींनी मराठीबरोबरच हिंदी चित्रपटातही खूप मोठ्या प्रमाणात भूमिका साकारल्या. चिमणी पाखरं या मराठी चित्रपटाची 'नन्हे मुन्ने' या नावाने रिमेक निर्माण करण्यात आली. तो सुलोचना यांचा पहिला हिंदी चित्रपट होय. औरत तेरी यह कहानी, सुजाता, झूला, संघर्ष, मेहरबान, रेश्मा और शेरा, नई रोशनी, मेरा घर मेरे बच्चे, अब दिल्ली दूर नहीं, आयी मिलन की बेला, आए दिन बहार के, दुनिया, आदमी, जॉनी मेरा नाम, धर्मात्मा, मजबूर, कसौटी, संन्यासी, कोरा कागज, कटी पतंग, प्रेम नगर, तलाश, रामपूर का लक्ष्मण, हीरा, गंगा की सौगंध अशा अनेक चित्रपटांत भूमिका साकारल्या. सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपटात त्यानी प्रामुख्याने चरित्र भूमिका साकारल्या. सुलोचनादिदींनी बंदिनी, चाळ नावाची वाचाळ वस्ती, कुणासाठी कुणीतरी या दूरदर्शन मालिकेतही भूमिका साकारलीय. एकेकाळी त्यांच्या हाती हिंदी चित्रपटाचे तब्बल चाळीस करार होते. आणि त्यांची सतत मुंबई ते चेन्नई (पूर्वीचे मद्रास) अशी धावपळ सुरू असतानाही त्या मराठी चित्रपटाला अजिबात विसरल्या नाहीत. हिंदी चित्रपटात भूमिका साकारत असताना अनेक मोठ्या स्टार्ससोबत भूमिका साकारण्याचा त्यांना योग आला. देव आनंद अनेकदा तरी वांद्र्याच्या मेहबूब स्टुडिओत शूटिंग करण्यास पसंती द्यायचा. तेथे येण्यापूर्वी तो सांताक्रूझच्या आपल्या ऑफिसमध्ये जाई आणि मग बरोबर अकरा वाजता मेहबूब स्टुडिओत पोहचे. त्यानंतर लंच ब्रेक वगळता संध्याकाळी सहा वाजेपर्यंत तो सेटवरच असे. या काळात त्याचा कधीही फोन येत नसे अथवा त्याला भेटायला कोणी पाहुणे येत नसत. हे विशेषच होते असे सुलोचनादिदी आवर्जून सांगतात. आपले काम संपले की एका बाजूला खुर्चीत बसून पुस्तक वाचणार आणि कधी कोला पिणार असे सुलोचनादिदींचे देव आनंदबद्दलचे निरीक्षण आहे.

बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर अशा राजकीय नेत्यांशी सुलोचनादिदींचे कौटुंबिक संबंध. एका वर्षी अमिताभ बच्चन दीदीना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी प्रभादेवी येथील त्यांच्या निवासस्थानी आले.

या त्यांच्या दीर्घकालीन प्रवासात त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यातील काही उल्लेखनीय आहेत. भारत सरकारने त्यांना १९९९ साली पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले. तर महाराष्ट्र शासनाने त्यांना १९७२ साली 'जस्टीस ऑफ पीस' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर १९९७ साली त्यांना 'व्ही. शांताराम पुरस्कार' देण्यात आला.

सुलोचना दीदींचे सार्वजनिक कार्यही खूपच मोठ्या प्रमाणात आहे. १९६१ साली चिनी आक्रमणाच्या वेळी भारत सरकारच्या आवाहनानुसार त्यांनी तत्कालिक मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आपल्या दिवंगत वहिनीचे सर्व दागिने दिले. तर १९६५च्या पाकिस्तान विरुध्दच्या लढाईच्या वेळी रक्तदान करणे, मुंबईच्या अश्विनी मिलीटरी हॉस्पिटलमध्ये जखमी जवानांची भेट घेतली. त्यांनी काही काळ अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे उपाध्यक्षपद भूषविले आहे. १९९० साली मुंबईजवळच्या गावांना पुराचा प्रचंड तडाखा बसला, गावे उध्वस्त झाली, संसाराची वाताहत झाली, त्यावेळी सुलोचनादिदींनी अतिशय तातडीने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी संसारोपयोगी भांडी पाठवली.

सुलोचनादिदींनी चित्रपटात भूमिका साकारत असतानाच खूप मोठ्या प्रमाणात सामाजिक बांधिलकीही जपली हेच दिसून येते. वाचन करणे, उपग्रह वाहिनीवरील कार्यक्रम पाहणे अशा आवडी त्यांनी कायमच जपल्या. प्रभादेवी येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांनी भूमिका साकारलेल्या यशस्वी हिंदी चित्रपटाच्या रौप्यमहोत्सवी ट्रॉफीज आणि अनेक पुरस्कार अतिशय नेटकेपणाने लावलेल्या दिसत...रवि टंडन दिग्दर्शित 'मजबूर' या चित्रपटात सुलोचनादिदींनी अमिताभच्या आईची भूमिका साकारलीय...

सुलोचनादिदींबाबत अशा अनेक गोष्टी आहेत. तशी त्यांची दीर्घकालीन यशस्वी वाटचाल आहे आणि त्यांच्या कर्तृत्वाचा जबरदस्त ठसाही आहे, तरीही त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्राप्त होऊ नये हे आश्चर्यकारक आहे...

सुलोचनादिदींचे अंत्यदर्शन घेत असताना माझ्या डोळ्यासमोरून हा सगळाच पट सरकत होता. मराठी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील त्या एक साक्षीदार, साथीदार, भागीदार आहेत हे कायमच अधोरेखित होत राहिल. हीच त्यांना श्रध्दांजली.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

# सुलोचनादिदी... मोठ्या वाटचालीच्या साक्षीदार

**सुलोचनादिदींच्या प्रभादेवी येथील निवासस्थानी त्यांचे अंत्यदर्शन घेत असतानाच जवळपास चाळीस वर्षांपूर्वी त्यांच्याशी झालेली माझी 'पहिली भेट' आठवत होती. मी मिडियात नवीन असूनही त्यांनी मला फारच सांभाळून घेतले हे मला फारच महत्वाचे वाटले होते. तेव्हापासून माझ्या त्यांच्याशी अनेक भेटीगाठी होत राहिल्या. त्यांच्या ३० जुलै या वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना वाकून नमस्कार करुन त्यांचे आशीर्वाद घेऊ लागलो. हे सगळेच माझ्या डोळ्यासमोर आले आणि तेव्हाच वाटले, दिदींच्या रुपेरी कारकिर्दीच्या यशस्वी प्रगती पुस्तकावर सहज नजर टाकली तरी त्या दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी पात्र आहेत हे पुन्हा वेगळे सांगायला नकोच. असा आणि इतका त्यांचा अभिनय प्रवास आणि अनुभव आहे.**















# गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना




**कुठल्याही योजनेचे यश हे लोकाभिमुखता, पारदर्शकता व सुलभ कार्यप्रणालीवर अवलंबून असते. सर्वसामान्यांची कामे सुलभरित्या व स्थानिक पातळीवर होणे आवश्यक असते. शासन प्रत्येक क्षेत्रात विकासाच्या अनेक योजना राबवित असते. गरजूंसाठी तो आधार तर असतोच त्याचप्रमाणे, सामूहिक विकासप्रक्रियेलाही त्यातून गती मिळत असते. हे लक्षात घेऊन नागरिकांना विविध योजनांचे थेट लाभ मिळावेत, यासाठी शासनाने शासन आपल्या दारी...! हा एक महत्वाकांक्षी विशेष उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत विविध शासकीय योजनांची जिल्हा माहिती कार्यालयामार्फत प्रसिध्दी करण्यात येत असून काय आहेत शासकीय योजना.. जाणून घेऊया लेखातून...**

राज्यात महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार संपूर्ण गोवंशीय प्राण्यांच्या कत्तलीवर प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामुळे शेतीकाम, ओझी वाहणे व पैदाशीसाठी उपयुक्त नसलेले गोवंशीय बैल व वळू यांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आली आहे. परिणामी, कालांतराने शेती व दूध यासाठी अनुत्पादक असलेल्या गोवंशीय पशुधनाच्या संख्येत वाढ होणार असल्याने या सर्व पशुधनाचा सांभाळ अथवा संगोपन करणे आवश्यक असल्याने शासनाने सुधारीत 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र' सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे तसेच यापूर्वी २६ एप्रिल २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात आलेल्या योजनेमध्ये ज्या ३२ तालुक्यातील गोशाळांना अनुदान देण्यात आले आहे, ते तालुके वगळून ३४ जिल्ह्यातील ३२४ तालुक्यांमधून प्रत्येकी एक याप्रमाणे ३२४ गोशाळांची अनुदानासाठी निवड करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**असे असेल अनुदान**

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजने अंतर्गत ५० ते १०० पशुधन असलेल्या गोशाळेस १५ लाख रुपये, १०१ ते २०० पशुधन असलेल्या गोशाळेस २० लाख रुपये आणि २०० पेक्षा अधिक पशुधन असलेल्या गोशाळेस २५ लाख रुपये एवढे अनुदान. प्रथम टप्प्यात ६० टक्के व निर्धारीत निकषाच्या पूर्तीनंतर द्वितीय टप्प्यात ४० टक्के अनुदान अर्थसहाय्य म्हणून देण्यात येईल.

**योजनेचा उद्देश**

दुग्धोत्पादनास, शेतीकामास, पशु–पैदाशीस, ओझी वाहण्याच्या कामास उपयुक्त नसलेल्या अथवा असलेल्या गाय, वळू, बैल व वय झालेले गोवंश यांचा सांभाळ करणे. या पशुधनासाठी चारा, पाणी व निवाऱ्याची सोय उपलब्ध करुन देणे. गोवर्धन गोवंश सेवा केंद्रामधील पशुधनासाठी आवश्यक असलेल्या वैरणीसाठी वैरण उत्पादन कार्यक्रम राबविणे. गोमूत्र, शेण इ. पासून विविध उत्पादने, खत, गोबरगॅस व इतर उप–पदार्थांच्या निर्मितीस प्रोत्साहन देणे. तसेच विविध विभागाच्या अथवा संस्थांच्या सहकार्याने पशुसंवर्धन विषयक उपक्रम राबवून पशुपैदाशीच्या प्रचलीत धोरणानुसार देशी गायीच्या जातीचे संवर्धन व त्यांच्या संख्येत वाढ होण्याकरीता, संस्थेकडील देशी तसेच गावठी गायींमध्ये शुद्ध देशी गायीच्या जातीच्या वळूचे वीर्य वापरून कृत्रिम रेतन करून घेणे. कृत्रिम रेतनाने पैदास झालेली नर वासरे महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या मागणीनुसार गोठीत रेतन प्रयोगशाळेसाठी नाममात्र दराने उपलब्ध करून देण्यात येईल. कृत्रिम रेतनाने पैदास झालेली उर्वरीत नर वासरे व कालवडी यांची मागणीप्रमाणे शेतकऱ्यांना विक्री करण्यात येतील.



**लाभार्थी निवडीचे निकष**

गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेचा लाभ घेण्यासाठी ही संस्था धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत असावी. संस्थेस गोवंश संगोपनाचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असावा. केंद्रावर असलेल्या पशुधनास आवश्यक असलेली वैरण अथवा चारा उत्पादनासाठी तसेच पशुधन संगोपनासाठी संस्थेकडे स्वत:च्या मालकीची अथवा ३० वर्षांच्या भाडेपट्ट्यावरची किमान पाच एकर जमीन असावी, संस्थेने या योजनेंतर्गत मागणी केलेल्या एकूण अनुदानाच्या कमीत कमी १० टक्के एवढे खेळते भाग–भांडवल संस्थेकडे असणे आवश्यक आहे. संस्थेचे नजीकच्या मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण झालेले असणे आवश्यक आहे. संस्थेस गोसेवा अथवा गो–पालनाचे कार्य करण्यासाठी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यासोबत करारनामा करण्याचे बंधनकारक राहील, संबंधित संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे. संस्थेवर कार्यरत कर्मचारी अथवा मजूर यांचे वेतन इत्यादींचा खर्च संस्थेकडून अदा करण्यासाठी संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असावी.

या योजनेंतर्गत ज्या बाबीसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल, त्याच बाबीसाठी भविष्यात नव्याने कोणतेही अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार नाही. ज्या संस्थांकडे पशुधनाच्या देखभालीसाठी व चाऱ्यासाठी स्वतःच्या उत्पन्नाचे साधन आहे, अशा संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

या योजनेमध्ये प्रामुख्याने खालील मुलभूत सुविधाकरीता अनुदान देय ठरेल पशुधनासाठी नवीन शेडचे बांधकाम, चाऱ्याची, पिण्याची पाण्याची व्यवस्था व वैरण उत्पादनासाठी पाण्याच्या उपलब्धेकरिता विहीर बोअरवेल, चारा कटाई करण्यासाठी विद्युतचलित कडबाकुट्टी यंत्र, मुरघास प्रकल्प, गांडूळखत निर्मिती प्रकल्प, गोमूत्र, शेण यापासून उत्पादन निर्मिती प्रकल्प व विक्री केंद्र इत्यादी, अशा प्रकारच्या मुलभूत सुविधांकरिता अनुदान देण्यात येईल याकरिता संस्थांच्या प्रस्तावामध्ये वरील बाबींचा समावेश करण्यात यावा. जुन्या शेडच्या दुरूस्तीकरिता या योजनेमधून अनुदान मिळणार नाही.

कृषी अथवा पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हास्तरीय विविध योजनांमधून, चारा उत्पादनांच्या योजनांमधून या गोशाळांना वैरण लागवडीसाठी बियाणे, खते, ठोंबे, हायड्रोपोनीक, वाळलेला चारा उत्पादन अथवा ओला चारा उत्पादन करण्यासाठी लाभ अनुज्ञेय राहतील. विद्युत जोडणी आवश्यक असल्यास कृषी अथवा कृषीपंप या बाबी अंतर्गत प्रचलित योजनेमधून या गोशाळांनी विद्युत जोडणी प्राप्त करुन घ्यावी. या लाभासाठी प्रस्तुत योजनेमधून अनुदान देय होणार नाही. याशिवाय या गोशाळांनी रुग्ण पशुधनास आवश्यक असलेल्या पशुवैद्यकीय सेवा जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत उपलब्ध करुन द्यावीत.

सुधारीत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र या योजनेतंर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज व माहितीसाठी उपआयुक्त, जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयाचे उपायुक्त डॉ. रत्नाकर काळे यांनी केले आहे.

**–मनोज शिवाजी सानप, जिल्हा माहिती अधिकारी, रायगड–अलिबाग**

# दुसऱ्यांना आनंद द्या!

आपण आपल्या आसपास अनेक लोकांना बघतो. प्रत्येकाची मनोवृत्ती वेगवेगळी आहे. प्रत्येकाचे विचार–आचार वेगवेगळे आहेत, पण आपण आपल्या जवळ असे काही लोक बघतो की, ते दुसऱ्यावर फक्त हसण्याचा काम करतात किंवा कुणी काही चांगले काम करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या मनात नकारात्मकता तयार करून त्यांना त्याविषयी निरूत्साही बनवतात.

काही लोक असे असतात की, त्यांना दुसऱ्यांची प्रगती बघून होत नाही. असे लोक नेहमी दुसऱ्यांचा कामामध्ये बाधा निर्माण करतात. अशी नकारात्मक विचाराची लोक स्वतःची तर प्रगती करीत नाही परंतु कुणी चांगले काम करीत असेल तर त्यांच्या कामात समस्या निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात, अशी लोक कधी कुणाला चांगला सल्ला ही देत नाही आणि कुणी प्रगतीपथावर असले तर त्यांना मागे कसे खीचायचे येवढेच काम करीत असतात. अशी लोक कधी कुणाच्या चांगल्या कामाची प्रशंसा सुद्धा करीत नाही. आज आपण प्रत्येक क्षेत्रामध्ये असा लोकांना बघतो. आपले काही मित्र किंवा मैत्रीण असे नकारात्मक विचाराची असू शकतात.



आपण बघतो की, दुसऱ्यांच्या कामामध्ये बाधा निर्माण करणारे लोक कधीच सुखी नसतात. उलट ते कोणत्या ना कोणत्या अडचणीत किंवा दुःखी असतात. अश्या लोकांना मनाची शांती कधीच लाभत नाही. ही लोक समाधानी कधीच नसतात. मनाची शांती लाभण्यासाठी तर खूप मोठा मन लागतो. दुसऱ्याच्या आनंदात आपला आनंद शोधल्याने मनाची खरी शांती लाभत असतो. परंतू काही लोकांची खूप वाईट वृत्ती असतो. दुसऱ्याच्या दुःखात सहभागी न होता उलट त्यांना दुःख कसा होईल हे बघत असतात. काही आपल्या जवळील लोकसुद्धा असे असतात की, त्यांना आपल्यावर कोणती समस्या असली तर ते आपल्याला धीर देण्याचा फक्त देखावा करतात. मनात मात्र आपण दुःखी आहोत हे बघून त्यांना आनंद होत असतो. या काळामध्ये स्वतःचे भाऊ बहीण एकमेकांची प्रगती बघून जळत असतात. आता 'सख्खा भाऊच पक्का वैरी' होत असतो. म्हणजे आता आपण कोण आपले आणि कोण परके हे समजू शकत नाही.'माणूस जसा विचार करतो तसे त्याचे जीवन असतो. म्हणून माणसाने नेहमी दुसऱ्यांच्या हिताचे आणि सकारात्मक विचार करायला हवे. नकारात्मक विचार माणसाच्या दुःखाला कारणीभूत आहे. नकारात्मक विचाराने मनात भीती निर्माण होतो, त्यामुळे निराशा येतो. उत्साह कमी होतो. आत्मविश्वास कमी होतो .या सर्वाचा परिणाम आपल्या शरीरावर पडतो आणि आपण दुःखी होतो. म्हणून मनात नेहमी सकारात्मक विचार ठेऊन दुसऱ्यांचा पण सकारात्मक विचार केला पाहिजे.

आपण बघतो की, दुसऱ्यांची मदत करणारा मनुष्य आपल्याला नेहमी प्रसन्न दिसतो. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी शालीनता दिसतो.आपण जेव्हा दुसऱ्याचा भल्याचा विचार करतो त्यावेळी खरे आपले स्वतःचेच भले करीत असतो. दुसऱ्यांना आनंद दिल्याने आपले मन सुद्धा आनंदी होतो. 'मनात जे पेराल ते उगवेल अशी म्हण आहे. म्हणून नेहमी सकारात्मक विचार ठेवावे. दुसऱ्यांच्या चांगल्या कामाविषयी त्यांची प्रशंसा करायला शिका. दुसऱ्यांच्या आनंदात सहभागी झाल्याने आपल्यालाही आनंद मिळतो. म्हणून लोकांना आनंद देण्याचा प्रयत्न करा. दुसरे आनंदी तर आपणसुद्धा आनंदी नक्कीच होणार!

**–प्रिती व्ही. खोब्रागडे, गुरढा, लाखनी, भंडारा**



# नागपूरचे
# एनसीआय कर्करोग रुग्णालय
## देवेंद्र फडणवीस आणि संघाचा समाजासाठी आदर्श





**मानवजातीला कराल विळखा घालणाऱ्या कर्करोगावरील उपचारांच्या परवडणाऱ्या दरातील सोयी भारतात हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच ठिकाणी आहेत. त्यासाठी दक्षिण भारतात तर काही ठिकाणी धर्मांतरेही होत असत. हे थांबविण्याचा दृढनिर्धार भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी तरुणवयातच केला आणि आपल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील सहकारी-ज्येष्ठ मार्गदर्शक यांच्या साह्याने तो पूर्णही करून दाखवला. सरकारची फारशी मदत न घेता फडणवीस यांनी केवळ आपल्या व संघ सहकाऱ्यांच्या हिमतीवर आणि दानशूरांच्या देणग्यांवर आधारित धर्मादाय तत्वावरील पण जगातील अत्याधुनिक अशा या नागपूरच्या एनसीआय कर्करोग उपचार केंद्राची उभारणी आदर्शवत आहे.**

**बोले तैसा चाले...**

आपल्या वडिलांना कर्करोगापासून वाचविण्याची धडपड करतानाच हे रुग्णालय उभारण्याचा निर्धार देवेंद्र फडणवीस यांनी केला. दक्षिणेकडील काही धर्मादाय रुग्णालयांमध्ये कर्करुग्णांवर कमी दरात उपचार करताना त्या बदल्यात त्यांचे धर्मांतर करण्याचेही प्रकार होत असत. हे पाहून तर त्यांचा निर्धार आणखी पक्का झाला. नागपूरच्या एनसीआय रुग्णालयाचे औपचारिक उद्घाटन नुकतेच झाले अन् बोले तैसा चाले... ही उक्ती फडणवीस यांनी सार्थ करून दाखवली, अशी प्रतिक्रिया नागपूरकरांनी व्यक्त केली.

देवेंद्र फडणवीस म्हणजे कसलेले राजकारणी एवढीच ओळख आपल्याला आहे, मात्र जी गोष्ट स्वतःच्या वडिलांना न मिळाल्याने त्यांचा मृत्यू झाला तीच गोष्ट म्हणजे कॅन्सरवरील उपचार आपल्या समाजबांधवांना मिळावेत यासाठी त्यांनी दाखविलेली सहृदयता अन् जिद्दीने केलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी समाजाला विळखा घालणाऱ्या कर्करोगावर मात करण्याचे स्वप्न २००१मध्ये पाहिले. मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवेप्रमाणे मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्ग उभारून विदर्भ-मराठवाड्याला विकासाची फळे देण्याचे स्वप्न पाहिले. ही सारी स्वप्ने त्यांनी पूर्णही करून दाखविली. केवळ आश्वासने देण्यापेक्षा ठाम कृती करण्याचा फडणवीस यांचा हा स्वभावच सर्वकाही सांगून जातो.

**समाजासाठी अथक प्रयत्न**

आपल्या वडिलांचे म्हणजेच गंगाधरपंतांचे घशाच्या कर्करोगाने निधन झाल्याचे पाहून देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईच्या टाटा रुग्णालयाच्या तोडीस तोड किंबहुना त्याहीपेक्षाही मोठे असे रुग्णालय मी नागपूरला उभारीन आणि मग नागपूरच्या पंचक्रोशीतील कोणालाही कर्करोगावर उपचार करण्यासाठी धडपडत मुंबईला जावे लागणार नाही अशी प्रतिज्ञा सन २००१मध्ये केली. त्यानंतर त्यांनी त्यासाठी अखंड प्रयत्न केले. मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यावरही देवेंद्र फडणवीस यांनी स्वप्नपूर्ती करूनच दाखवली. नागपूरला देवेंद्र फडणवीस यांनी उभारलेल्या एनआयसीचीचा पुढचा टप्पा पूर्ण झाला की ते टाटा रुग्णालयापेक्षाही मोठे असे ते देशातील सर्वांत मोठे कर्करोग रुग्णालय होईल. केवळ मराठवाडा-विदर्भ-नागपूरच नव्हे; तर उत्तरपूर्व भारतातील कर्करोग्यांसाठी हे रुग्णालय वरदान ठरेल तसेच टाटा रुग्णालयात येणारा किमान अर्धा रुग्णांचा भार नागपूरच्या या रुग्णालयाकडे वळेल. त्यामुळे या दोन्ही रुग्णालयांना रुग्णांना फार चांगली सेवा देता येईल.

स्वतःसाठी स्वप्न तर सगळेच पाहतात, पण सामान्य लोकांकरता एखादे विशाल स्वप्न पाहून ते पूर्ण करण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करणाऱ्या ध्येयवादी व्यक्तींमुळे कोट्यवधी लोकांची स्वप्नपूर्ती होते. मुंबईच्या टाटा रुग्णालयाच्या तोडीस तोड कर्करोग रुग्णालय नागपुरात उभारून देवेंद्र फडणवीस यांनी अशी स्वप्ने पाहणाऱ्यांसाठी आदर्श उभा केला आहे, असे नागपूरकर बोलून दाखवित आहेत.

सर्वसामान्यांना कर्करोगावर चॅरिटेबल रुग्णालयात रास्त दरात मात्र खासगी रुग्णालयासारखी दर्जेदार सेवा देण्याचे शिवधनुष्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भागीरथ प्रयत्नांनी पेलले आहे. नागपुरात सुरू झालेल्या नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट या सर्वंकष कॅन्सर केअर सेंटरच्या उभारणीतून हीच गोष्ट दिसून आली आहे. आपले वडील गंगाधरपंत यांना घशाचा कर्करोग झाल्यानंतर त्यांना मुंबईला उपचारासाठी नेताना स्वतःला, वडिलांना आणि घरच्यांना होणारा त्रास त्यांनी पाहिला. कर्करोगाची भीषणता आणि सर्वांवरच त्याचा होणारा परिणाम पाहिला व त्याचा फार मोठा परिणाम त्यांच्या मनावर झाला. त्यातच वडिलांचे निधन झाल्यावर इतर लोकांवर ही वेळ येऊ नये यासाठी आपणच काहीतरी करायचे हे देवेंद्र फडणवीस यांनी तरुण वयातच ठरवून टाकले. त्यांचे लहानपणापासूनचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील मित्र शैलेश जोगळेकर यांनीही त्यांच्या या स्वप्नात साथ दिली. दुर्दैवाने जोगळेकर यांच्या पत्नीलाही १९९५मध्ये कर्करोग झाल्यावर त्यांनाही सहा वर्षे उपचारांसाठी धडपड करावी लागली. त्यांची ही धडपड अपयशी ठरल्याने त्यांनीही समाजासाठी सर्वस्व वाहून देण्याचे ठरवले. या दोघांच्या धडपडीला नागपुरातील समविचारी मित्र, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी-स्वयंसेवक, तज्ज्ञ डॉक्टर अशा सर्वांनी साथ दिली आणि संघभावनेनेच हे शिवधनुष्य सहज उचलले गेले.

देशात अनेक ठिकाणी खासगी रुग्णालयात कर्करोगांवर उपचार होतात, मात्र त्यापैकी कित्येक ठिकाणी व्यापारी तत्त्वावर रुग्णालयांकडून अव्वाच्या सव्वा पैसे घेतले जातात. राज्यात मुंबई-पुण्याबाहेर कर्करोगाची फारच कमी रुग्णालये आहेत. ती सेवाही सर्वसामान्यांना परवडत नाही. जुन्या काळात दक्षिण भारतात कर्करुग्णांवर सवलतीच्या दरात उपचार करून त्यांचे धर्मांतर करण्याचे प्रकार होत असत. कॅन्सर उपचारांची ही अवस्था पाहिल्यावर रुग्णालय काढण्याचा देवेंद्र फणडवीसांचा निर्धार आणखी पक्का झाला, मात्र सार्वजनिक चॅरिटेबल हॉस्पिटल म्हटले की तेथे गोंधळात धड सेवा मिळत नाहीत अशीही एक धारणा असते. त्यामुळे तसे हॉस्पिटल न उभारता जागतिक दर्जाचे, जागतिक दर्जाच्या सोयी देणारे रुग्णालय उभारण्याच्या दृष्टीने त्यांची वाटचाल सुरू झाली.

**संघ पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांताचे कार्यवाह विलास फडणवीस यांचेही यासाठी मार्गदर्शन मिळाले. दक्षिण भारतात कॅन्सर रुग्णांच्या आणि त्यांच्या नातलगांच्या होणाऱ्या धर्मांतराबाबत देवेंद्र फडणवीस यांनी पोटतिडकीने टीका केल्यावर त्यांनी हा मार्ग दाखवला. धर्मांतर करणाऱ्यांना दोष देऊ नका, तुम्ही तुमची रेषा, तुमचे प्रयत्न त्यांच्यापेक्षा मोठे करा, असे सांगून त्यांनी हे रुग्णालय सुरू करण्यास देवेंद्र फडणवीसांना प्रेरित केले. २००७ नंतर संघाच्या पश्चिम क्षेत्राचे प्रचारक सुनील देशपांडे यांनी या कामात रस घेतला. नागपुरातील डॉ. आबाजी थत्ते सेवा और अनुसंधान संस्थेमार्फत हे रुग्णालय उभारावे व चालवावे अशी कल्पना विलास फडणवीस यांनी मांडली होती. सुनील देशपांडे यांनी ही कल्पना पुढे नेली. यात आणखी समविचारी, ध्येयवादी व्यक्ती जोडल्या आणि एकत्र काम सुरू केले. या कामात स्वतःची आणि धर्मादाय रुग्णालयाच्या मॉडेलची परीक्षा घेण्यासाठी धरमपेठला २५ खाटांचे छोटे रुग्णालय सुरू करण्याचे ठरले. ज्या गंभीर कर्करुग्णांची खूप काळजी घ्यावी लागते, अशांच्या सेवेसाठी २०१२मध्ये हे हॉस्पिटल सुरू केले आणि त्याचवेळी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटची घोषणा झाली.

**काटेकोर नियोजनाचे यश**

या रुग्णालयासाठी सर्वप्रथम जागेचा शोध सुरू झाला आणि जामठा विभागात साडेचौदा एकरांवर तसे नियोजन सुरू केले, कारण नंतर काही दशकांनंतर रुग्णालयाच्या विस्तारासाठी नवी जागा मिळवणे अत्यंत जिकिरीचे ठरणार असल्याचा अंदाज तेव्हाच आला होता. साडेतीनशे खटांचे रुग्णालय उभारण्यासाठी पैसा उभारण्याची धडपड सुरू केली २०१२पासून सार्वजनिक क्षेत्रातील ओएनजीसी, एनटीपीसी, कोल इंडिया आदी मोठ्या कंपन्यांकडे सीएसआर निधीसाठी प्रेझेंटेशन दिले. दीड वर्ष प्रयत्न केल्यावर ओएनजीसीने मोठी देणगी दिली आणि २०१५मध्ये रुग्णालयाचे भूमिपूजन झाले. त्याआधीच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने त्यांनी ट्रस्टचे अध्यक्षपद सोडले होते. तरीही सर्व आराखडा, निधी आणि मनुष्यबळ तयार असल्यामुळे रुग्णालयाचे बांधकाम सुरू झाले. महत्त्वाचे म्हणजे या रुग्णालयाच्या काटेकोर नियोजनासाठी दोन वर्षे खर्च करण्यात आल्याने सारे व्यवस्थित झाले. २०१२पासून २०१४पर्यंत वैद्यक व्यवसायिक, अन्य व्यावसायिक, तज्ज्ञ, कायदेपंडित, जाणकार यांच्याशी रुग्णालयाच्या पुढील सत्तर वर्षांच्या वाटचालीबाबत चर्चा करून ठेवली होती. त्यानुसार या ठिकाणी सर्वंकष कर्करोग केंद्र ज्यात उपचार, रोगनिदान, संशोधन आदी सर्व बाबी होऊ शकतील असे केंद्र उभारण्याचे नियोजन झाले होते.

२०१५मध्ये बांधकाम सुरू झाल्यानंतर रुग्णालयाचा काही भाग आधी सुरू करावा व उरलेले रुग्णालय नंतर पूर्ण करावे असे आधीच ठरले होते. त्यानुसार ऑगस्ट २०१७मध्ये या रुग्णालयाचा पहिला टप्पा कार्यरत करण्यात आला. यात केमोथेरपी, रेडिएशन, डायग्नोसिस, न्यूक्लियर मेडिसिन या बाबी सुरू करण्यात आल्या होत्या. संपूर्ण रुग्णालयाला लागणारे मनुष्यबळही तयार केले आणि त्यानंतर उर्वरित बांधकाम आणि उपचार सुरू झाले. आता येथे गेली पाच-सहा वर्षे झारखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा, हैदराबाद येथूनही रोगी येत आहेत.

**ब्लडकॅन्सरग्रस्त मुलांवर निःशुल्क उपचार**

देशातील अन्य खासगी कर्करोग रुग्णालयांच्या तुलनेत येथे एक तृतीयांश दर आकारला जातो. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आदी सर्व सरकारी योजना येथे लागू आहेत. सरकारच्या नियमानुसार काही टक्के गरिबांना निशुल्क रुग्णसेवा दिली जाते, तर गरीब या वर्गात न बसणाऱ्या पण मध्यमवर्गीय रुग्णांसाठी ट्रस्टच्या कॅन्सर केअर फंड मधून मदत केली जाते. या फंडासाठी अनेक संस्था तसेच दानशूर व्यक्तीही मदत करतात. बारा वर्षापर्यंतच्या ज्या मुलांना ब्लड कॅन्सर होतो त्यांना दीड ते अडीच वर्ष योग्य उपचार मिळाले तर त्यांचे आयुष्य पन्नास-साठ वर्षांनी वाढते. त्यासाठी या मुलांचे उपचार निःशुल्क करण्याचा निर्णय रुग्णालयाने घेतला. त्यासाठीही दानशूर व्यक्तींकडून निधी घेतला जातो. आतापर्यंत एक हजार मुलांना या योजनेतून मदत देण्यात आली आहे व त्या उपचारांना यश मिळण्याचे प्रमाण ९३ टक्के आहे.

**आधुनिक उपचारपद्धती**

आवश्यकता भासल्यास हे रुग्णालय साडेसातशे खाटांपर्यंत वाढू शकते. तसे केल्यास हे देशातील धर्मादाय क्षेत्रातील सगळ्यात मोठे रुग्णालय होईल. यापुढे जगातील सगळ्यात आधुनिक तंत्रज्ञान या रुग्णालयात आणण्याचे नियोजन आहे. त्यानुसार प्रोटॉन बिन थेरेपी, कार्बन आर्यन थेरेपी आदी सगळ्या उपचारपद्धती येथे येतील. यातील कार्बन आयर्न थेरेपी तर आशियातील कोणत्याही रुग्णालयात अजून वापरली जात नाही. हे तंत्रज्ञान जगात केवळ १५ ठिकाणीच वापरले जाते.

इतर रुग्णालयांमध्ये सिटीस्कॅनसाठी जेथे चार ते पाच हजार रुपयांचा खर्च येतो. त्याला येथे केवळ बाराशे रुपये आकारले जातात. ज्या रुग्णांना खाजगी खोल्या हव्या असतात त्यांना जास्त पैसे आकारून ते पैसे गरीब रुग्णांवर खर्च केले जातात. मोठ्या कंपन्यांचे तसेच व्यक्तींचीही आर्थिक मदत मिळतेच, पण तरीही येथे नफ्यासाठी काम होत नाही. रुग्ण व त्यांचा एक नातलग यांना इथे निःशुल्क व सात्विक अन्न दिले जाते.

या कामात सन २००२पासून कॅन्सरतज्ज्ञ डॉ. आनंद पाठक हे देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर होते. ते आता रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक असून जोगळेकर हे रुग्णालयाचे सीईओ म्हणून काम पाहतात. रुग्णालय उभारताना निधीसह अडचणीही भरपूर आल्या. कोविड काळात रुग्णालयाचे बांधकाम थांबले. कोविडचे वर्ष खूप कठीण गेले, त्या काळात देणग्याही थांबल्या, मात्र तरीही तेथे शंभर खाटांचा कोविड वॉर्डही सुरू करण्यात आला. या रुग्णालयातील डॉक्टरांच्या पहिल्या फळीला टाटा रुग्णालयात प्रशिक्षण मिळाले. आता नंतरच्या डॉक्टरांना रुग्णालयातच केंद्र सरकारच्या मान्यतेने प्रशिक्षण मिळणार असून त्यासाठी फेलोशिप प्रोग्राम सुरू झाला आहे. रुग्णांच्या शंभर नातलगांसाठी यात्रीकेंद्र सुरू करण्यात आले आहे. साडेतीनशे खोल्यांचे मोठे सुसज्ज यात्रीनिवास सुरू करण्याचे कामही तीन-चार महिन्यात सुरू होणार असून ते दोन वर्षांत पूर्ण होईल.

आपल्याला एखादी गोष्ट मिळाली नाही तर निदान ती दुसऱ्याला तरी मिळावी आणि त्याच्या आयुष्याचे कल्याण व्हावे असा विचार करणारे आणि त्यासाठी झपाटून काम करणारे फारच थोडे लोक समाजात असतात. देवेंद्र फडणवीस यांच्यासारख्या अशा झपाटलेल्या माणसांच्या स्वप्नांचा आणि त्यांच्या धडपडीचा आदर्श सर्वांनीच घेण्याची गरज आहे, अशा शब्दांत अनेक रुग्ण त्यांची प्रशंसा करीत आहेत.

**-शैलेश जोगळेकर,**
**सीईओ, एनसीआय नागपूर**

### रुग्णालयाची वैशिष्ट्ये

- नियमित रुग्णांच्या ३५० खाटा
- रुग्णांसाठी डे केअरच्या १२० खाटा
- पाच वर्षांत ३३ हजार रुग्णांची नोंद
- रोज पाचशे रुग्णांवर ओपीडीत उपचार
- ७५० खाटांपर्यंत क्षमतावाढ शक्य
- प्रोटॉन बिन थेरेपी, कार्बन आर्यन थेरेपी येणार
- कार्बन थेरेपीचा जगात फक्त १५ देशांत वापर

### उपचारपद्धती आणि खर्च

- खासगी रुग्णालयांच्या तुलनेत एक तृतीयांश दर
- सर्व सरकारी सवलत आरोग्य योजना येथे लागू
- काही टक्के खाटांवर गरीबांना निःशुल्क उपचार
- निकषांनुसार गरीब नसलेल्यांवर कॅन्सर केअर फंडातून उपचार
- रुग्ण व एका नातलगाला निःशुल्क भोजन
- ब्लडकॅन्सरग्रस्त एक हजार बालकांवर निःशुल्क उपचार
- यात यश मिळण्याचा दर ९३ टक्के

### देणग्या

- ओएनजीसीने मोठी देणगी दिली
- संस्था आणि दानशूरांकडून देणग्या
- स्पेशल रूमसाठी रुग्णांकडून जादा दर
- ती रक्कम गरीबांवर खर्च

### अद्ययावत रुग्णालय

**जेव्हा गरज भासेल तेव्हा या रुग्णालयाची क्षमता ७५० खाटांपर्यंतही नेली जाईल तेव्हा ते भारतातील सर्वात मोठे कर्करोग रुग्णालय होईल. धर्मदाय रुग्णालय असूनही जागतिक दर्जाचे व सर्व आधुनिक उपचारपद्धती व वैद्यकीय यंत्रसामुग्री असलेले हे रुग्णालय आहे. भविष्यातही उपचारांकरिता लागणारी अद्ययावत उपचारपद्धती येथे वापरली जाईल.**



## निवडक

### खारघर वसाहतीमध्ये महिलेवर अत्याचार

**पनवेल :** पीडित महिलेच्या असह्यतेचा फायदा उचलत तिला राहण्यासाठी घरात प्रवेश दिल्यानंतर तिच्यावर मध्यरात्री अत्याचार केल्याची धक्कादायक घटना खारघर वसाहतीमध्ये घडली. ३० वर्षीय पीडिता खारघर वसाहतीमध्ये नोकरीसाठी अनेक ठिकाणी फीयार्द करत होती. या दरम्यान तिला संशयित आरोपीने भाड्याने घर देतो असे आश्वासन देऊन तिला स्वतःच्या घरी नेले. संबंधित आरोपीने या पीडितेबाबत स्वतःच्या पत्नीला घर मिळेपर्यंत ती घरातच राहील असे सांगितले होते. घरात आश्रय दिल्यावर मध्यरात्री कुटूंबातील सर्व जण झोपल्यावर पीडितेवर अत्याचार केल्याचे पीडितेने खारघर पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. याबाबत वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजीव शेजवळ हे अधिक तपास करीत आहेत.

### आश्रमशाळेत गरजेच्या वस्तूंचे वाटप



**उरण :** शहरातील कामठा येथील जय गणेश फ्रेंड्स क्लब यांच्या वतीने शांतीवन (नेरे, पनवेल) येथील अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे निवासी आदिवासी आश्रम शाळेला विद्यार्थ्यांसाठी अत्यंत गरजेची वस्तू स्वरूपात मौल्यवान असे २५० सतरंज्या आणि २५० बेडशीट भेट देण्यात आले. या आश्रमशाळेला उरणमधील सामाजिक कार्यकर्ते तथा चित्रपट अभिनेता आनंद भरत ठक्कर यांनी विद्यार्थ्याच्या गणवेशासाठी सामाजिक बांधिलकी जपत २९,५०० रुपये देणगी दिली आहे. योग्य वेळी योग्य मदत निःस्वार्थ भावनेने केल्याने कूष्टरोग निवारण समिती शांतीवनच्या अध्यक्षा रक्षा मेहता यांनी जय गणेश फ्रेंड्स क्लब व अभिनेता आनंद भरत ठक्कर यांचे आभार मानले आहेत. या वेळी प्रियवंदा तांबोटकर, दीपक दळी, योगेश म्हात्रे, चेतन ठक्कर, अमन थळी आदी उपस्थित होते.

# भारत आर्थिक महासत्ता होईल

## आमदार गणेश नाईक यांनी व्यक्त केला विश्वास

**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत व्यापारी आणि आर्थिक महासत्ता म्हणून विश्वात उदयास येईल, असा विश्वास आमदार गणेश नाईक यांच्या वतीने ऐरोली येथे व्यक्त केला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्रातील लोककल्याणकारी सरकारला नऊ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने देशभरात भारतीय जनता पक्षातर्फे विशेष जनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत ऐरोली विधानसभा मतदारसंघासाठी वाशी येथे व्यापारी वर्गाकरिता स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना आमदार नाईक यांनी व्यापारी वर्ग हा भाजपाचा खंदा समर्थक असून पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत व्यापारी आणि आर्थिक महासत्ता म्हणून विश्वात उदयास येईल, असा विश्वास व्यक्त केला.

वाशी येथील गुजरात भवनमध्ये व्यापारी बंधूंच्या भरगच्च उपस्थितीमध्ये व्यापारी संमेलन झाले. नवी मुंबईतील विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकनेते आमदार गणेश नाईक यांच्यासह भाजपचे नवी मुंबई प्रभारी अतुल काळसेकर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, ऐरोली विधानसभा क्षेत्राचे प्रथम आमदार संदीप नाईक, महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती अनंत सुतार, शरद मारू, अमृत लाल जैन, मोहन गुरुनानी, निलेश भाई व्होरा, अमरीश बारोट, कीर्ती राणा, सुनील छाजेड, मनोज जैन, चंद्रकांत ढोले, प्रमोद जोशी, लालू भाई श्रीश्रीमाळ संजय आवारे, भगवती पगारिया, राजू मनियार, माजी नगरसेवक सर्वश्री प्रकाश मोरे शशिकांत राऊत अमित मेढकर, अशोक पाटील, सामाजिक कार्यकर्ते विजय वाळुंज, अजय वाळुंज, अशोक पाटील, संपत शेवाळे आप्पा मुळे, अरुण पडते, दिनेश पारेख आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मोदी सरकारच्या नववर्षांच्या कामगिरीवर प्रकाशझोत टाकणारी 'सेवा सुशासन आणि गरीब कल्याण' चित्रफीत दाखवण्यात आली.

लोकनेते आमदार नाईक यांनी पंतप्रधान मोदी यांच्या मागील नऊ वर्षांच्या कार्यकाळामध्ये देशातील सर्व घटकांचे हित समानतेने साधले गेल्याचे सांगितले. जागतिक स्तरावर भारताच्या नेतृत्वाला गांभीर्याने घेतले जाऊ लागले आहे. भारताचे लष्करी सामर्थ्य वाढले त्यामुळे भारताकडे वाकडा डोळा करून पाहण्याची शत्रू राष्ट्रांची हिंमत होत नाही. नरेंद्र मोदीजी यांनी राबविलेल्या धोरणांमुळे भारत जगामध्ये पाचवी सर्वांत मोठी आर्थिक महासत्ता बनला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भारत जगात एक नंबरचा देश बनेल असा विश्वास व्यक्त करून सर्वात प्रथम ज्या घटकांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर विश्वास ठेवला तो घटक व्यापारी वर्ग होता, असे आवर्जून सांगितले.

डॉ. संजीव नाईक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वामुळे भारताचा जगात सन्मान वाढल्याचे सांगितले. मोदी सरकारने व्यापाऱ्यांच्या हिताच्या अनेक योजना सुरू केल्या यामध्ये पेन्शन योजना, व्यवसायाकरता सुलभ मुद्रा कर्ज योजना, डिजिटल पेमेंट सुविधा अशा अनेक योजनांचा समावेश आहे. नवी मुंबईच्या विकासामध्ये व्यापारी वर्गाचे मोठे योगदान आहे, असे ते म्हणाले. या मेळाव्यात व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनीदेखील व्यापारी वर्गाच्या अपेक्षा आणि मागण्या मांडल्या. पूर्वलक्षी प्रभावाने एपीएमसी प्रशासनाने सेवा कर भरण्यासाठी पाठवलेल्या नोटिसा रद्द करण्याची मागणी शरद मारू यांनी केली. लोकनेते आमदार नाईक, माजी खासदार डॉक्टर नाईक आणि ऐरोली विधानसभेचे प्रथम आमदार संदीप नाईक हे सर्वजण व्यापारी वर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर असतात याबद्दल श्री मारू यांनी धन्यवाद दिले.

**'व्यापाऱ्यांचे सर्व प्रश्न सोडविणार'**

**या मेळाव्यामध्ये व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींनी लोकनेते आमदार गणेश नाईक यांना लेखी निवेदने देऊन त्यांना भेडसावत असलेल्या समस्या सोडविण्याचे साकडे घातले. त्याचा संदर्भ देत एपीएमसी फ्री होल्ड करण्याचा विषय असो किंवा सेसचा विषय असो सर्व प्रश्न सोडविण्यात येतील, अशी ग्वाही त्यांनी उपस्थित व्यापारी बंधूंना दिली.**

## नवी मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

अदा केल्या जाणाऱ्या रक्कमांवर योग्य रितीने कर कपाती केली जावी यादृष्टीने आयकर विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये टीडीएस व आयकराबाबतच्या तरतूदींविषयी विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आलेले होते.



नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, लेखा विभागप्रमुख मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या आयकरविषयक प्रशिक्षण सत्रात लेखाविषयक कामकाज पाहणाऱ्या महापालिकेतील अधिकारी, कर्मचारीवृंदाने मोठ्या संख्येने उपस्थित रहात टीडीएस व आयकराची प्रणाली समजून घेतली.

आयकर विभागाचे उपआयुक्त श्री. सुरेंद्रसिंग चरण यांनी सादरीकरणाव्दारे टीडीएस व आयकर कपातीबाबतच्या नियमांची सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे महापालिका अधिकारी, कर्मचारी यांनी विचारलेल्या शंकांचे विस्तृत विवेचन देत निरसन केले.

या वेळी व्यासपिठावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, क्रीडा विभागाच्या उपायुक्त मंगला माळवे, आयकर अधिकारी हेमंत कुमार, महेश एस. लखविंदर सिंग उपस्थित होते. या प्रशिक्षण सत्राचा लाभ घेण्यासाठी परवाना विभागाचे सहाय्यक आयुक्त चंद्रकांत तायडे तसेच लेखाधिकारी सर्वश्री मारोती राठोड, दयानंद कोळी, दर्शन तांडेल, दिपक पवार आणि इतर अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे यांनी आयकर विभागाने हे प्रशिक्षण सत्र नवी मुंबई महापालिकेच्या अधिकारी, कर्मचारीवृंदासाठी आयोजित करून टीडीएस व आयकराबाबत सविस्तर माहिती दिल्याबद्दल आभार मानले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती

**पनवेल : वार्ताहर**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती करंजाडेत विविध कार्यक्रमांनी साजरी झाली.

राजमाता अहिल्यादेवी यांची मिरवणूक काढण्यात आली. त्याचबरोबर मान्यवरांनी उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. महिलांसाठी पैठणीचा कार्यक्रम झाला. हरी लव्हटे, प्रमोद वाघमोडे, महालू घुटूकडे, अन्नासो पडळकर, सचिन गोरड, रणजित नरुटे, नारायण चवरे, योगेश मोटे, मारुती सरगर, महादेव पुकळे सांगवे, प्रदीप बोंडवे, सुनील मिसाळ, सोनाली कोळेकर, शितल गोरड यांनी कार्यक्रम यशस्वी केले.

## कोसळलेल्या झाडामुळे वाहतुकीस अडथळा

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर १ येथील एनएल २ परिसरात मंगळवारी एक झाड अचानक कोसळले. त्याबाबतची तक्रार भाजपच्या माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी नेरूळ विभाग कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांना केली होती, मात्र दोन दिवस उलटल्यावरदेखील या घटनेची नोंद संबंधित विभागाने न घेतल्याने सुतार यांनी महापालिका प्रशासनाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली आहे.



पाऊस, वादळ, वारा अशी कोणती परिस्थिती नसताना कोसळलेल्या या झाडामुळे रहिवाशांचे कंपाउंड तुटले असून एका रिक्षाचेदेखील नुकसान झाले असून याला प्रशासन जबादार असल्याचा आरोप सुतार यांनी केला आहे. येत्या काही दिवसांत मान्सून सुरू होणार असून शिरवणे आणि सेक्टर १ परिसरातील झाडांची छाटणीच झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. कोसळलेले झाड मुख्य रस्त्यात असल्याने रहदारीस अडथळा निर्माण होत असून मागील दोन दिवस पाठपुरावा करूनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सुतार यांनी केला आहे. याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# तब्बल १६३ किलो वजनाच्या महिलेचे मातृत्वाचे स्वप्न पूर्ण

**पनवेल : प्रतिनिधी**

अतिशय धैर्याने व निर्धारपूर्वक आव्हानांचा यशस्वीपणे सामना केला जाण्याची लक्षणीय घटना कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईमध्ये घडली आहे. ३७ वर्षांच्या शीतल यांनी (नाव बदलण्यात आले आहे) अनेक वैद्यकीय अडचणींवर मात करून मातृत्व मिळवण्याचे स्वतःचे स्वप्न पूर्ण केले आहे.

आयव्हीएफमार्फत गर्भवती राहिलेल्या शीतल यांनी कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईमध्ये स्थूलपणा, ७०.६ बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) आणि गर्भारपणात तब्बल १६३ किलोपर्यंत वाढलेले वजन असूनदेखील जुळ्या मुलींना यशस्वीपणे जन्म दिला आहे.

मातृत्व मिळवण्यासाठी त्यांनी स्थूलपणावरून टीका टोमणे व गर्भवती राहण्याचे अयशस्वी प्रयत्न सहन करण्याच्या तब्बल एक दशकभराच्या संघर्षात यश मिळवले. मूल व्हावे यासाठी दहा वर्षे केलेले प्रयत्न असफल ठरले आणि अखेरीस शीतल यांनी आपल्या व्यावसायिक जीवनातून १८ महिन्यांचा ब्रेक घेतला आणि मातृत्वाचे स्वप्न पूर्ण करण्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित केले. त्यावेळीदेखील बीएमआय खूप जास्त असल्यामुळे त्यांना अनेक अडीअडचणी सहन कराव्या लागल्या.

**जुळ्या मुलींना दिला जन्म**

श्रीमती शीतल सांगतात, मोठी होत असताना मला स्थूलपणामुळे बॉडी शेमिंगचा खूप त्रास सहन करावा लागला. लग्नानंतर एक दशकभर मी मातृत्वाचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी हर तऱ्हेने प्रयत्न करत होते. वजन जास्त असूनदेखील मला वाटत होते की, मला फक्त थायरॉईड आहे आणि स्थूलपणाशी संबंधित कोणतीही इतर व्याधी गर्भवती राहण्याच्या माझ्या क्षमतेच्या आड येत नव्हती.

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईमध्ये कन्सल्टन्ट गायनॅकोलॉजिस्ट, ऑब्स्टट्रिशियन आणि लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. रेणुका बोरिसा यांच्या नेतृत्वाखालील समर्पित हेल्थकेयर टीमने शीतल यांच्याकडे अतिशय बारकाईने लक्ष दिले. सिझेरियन सेक्शनमार्फत प्रसूती करवून, जुळ्यांची डिलिव्हरी करवणाऱ्या डॉ. बोरिसा यांनी सांगितले, स्थूलपणाची व्याधी असलेल्या महिलेच्या गर्भारपणावर खूप बारकाईने लक्ष ठेवावे लागते. ऑपरेशन थिएटर आणि मॉनिटरिंगसाठी लागणारी उपकरणे इत्यादी अनेक गोष्टी सदैव तयार ठेवाव्या लागतात.

प्रसूती सुरक्षितपणे पार पडावी यासाठी डॉ बोरिसा आणि त्यांच्या टीमने प्रयत्नांची शर्थ केली. मुदतपूर्व प्रसूती होऊ नये यासाठी गर्भाशयाच्या तोंडाला टाके घालण्याची सर्व्हायकल सेर्कलजची प्रक्रिया आणि सिझेरियन सेक्शनमध्ये पोटाच्या महत्त्वाच्या टिश्यूमधून नेव्हिगेट करणे यांचा यामध्ये समावेश होता.

> **शीतल यांचे एका दशकापासूनचे मातृत्व मिळवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यात लक्षणीय भूमिका बजावल्याचा आम्हाला अतिशय अभिमान वाटत आहे.**
>
> **–डॉ. बिपीन चेवले, संचालक व प्रमुख, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई**

## शिवप्रिया यांचा आज कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**



प्रख्यात अध्यात्मवादी, मानसशास्त्रज्ञ आणि एनर्जी हिलर कोमल परिहार शिवप्रिया रविवारी (दि. ११) मुंबईत येत आहेत. वाशी सेक्टर १४ येथील मेवाड भवनात शिवसुख येथे साधनेचा कार्यक्रम असणार आहे.

जीवनातील बदलत्या परिस्थितीत सतत आनंद मिळावा. ही साधना केल्याने जीवन आनंदाने, उत्साहाने भरून जाऊन उत्सवासारखे बनते. उर्जेमध्ये सामंजस्य स्थापित केल्याने सतत आनंद प्राप्त होतो. साधनेनंतर साधक शिवप्रियाला भेटून त्यांच्या समस्यांचे निराकरण करू शकतात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शिवप्रिया यांनी लोकांच्या वैदिक सर्वांगीण विकासाच्या संकल्पनेसाठी एकल्पी वेदम संस्थेची स्थापना केली होती. ही संस्था वैदिक ज्ञानाद्वारे आत्म-जागरूकता आणि पूर्ण क्षमतेच्या विकासासाठी विविध आध्यात्मिक पद्धती चालवते. आपल्या बहुतेक मानसिक आणि शारीरिक समस्यांचे समाधान आपल्या शरीरात, ऊर्जा चक्रात आणि आभामध्ये दडलेले आहे.

आपली उर्जा दुरुस्त करून आपण पूर्ण मानसिक आणि शारीरिक आरोग्याकडे वेगाने वाटचाल करू शकतो. या तत्त्वावर आधारित साधनेमध्ये शिवप्रिया साधकांना विविध वैश्विक शक्तींशी जोडते. अत्यंत सोप्या पद्धतीने ऊर्जा उपचार मार्गाचा अवलंब केल्याने, साधक आजच्या तणावपूर्ण वातावरणातही अपार आनंद अनुभवत त्यांचे कर्तव्य पार पाडू शकतात.

## मनोज संसारे यांची आज अभिवादन सभा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठ्यातील तमाम आंबेडकरी चळवळीतील पक्ष, संघटना, बौद्धजन पंचायत समितीच्या सर्व शाखा, दि बुद्धिष्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा, सामाजिक संस्था, मित्र मंडळे व सर्व भिम अनुयायी यांच्या वतीने आंबेडकरी चळवळीतील पँथर, युथ रिपब्लीकन व स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख यांच्या वतीने स्व. मनोज भाई संसारे यांच्या जाहीर अभिवादन सभेचे आयोजन कामोठे येथे रविवारी (दि. ११) करण्यात आले आहे.

अभिवादन सभा सायंकाळी ६ वाजता होणार असून प्रमुख उपस्थिती सागर भाई संसारे, अनिकेत मनोज संसारे यांची असणार आहे. अध्यक्षपद ज्येष्ठ पँथर, कामगार नेते विठोबा पवार भूषविणार असून सूत्रसंचालन कामोठे येथील सम्यक बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे सरचिटणीस सुनील जाधव आणि प्रास्ताविक कामोठे आरपीआयचे युवा अध्यक्ष आशिष कदम करणार आहेत. कामोठे सेक्टर ११ येथील सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज या ठिकाणी अभिवादन सभा होणार आहे.

# गरजू मातेची विनामूल्य प्रसुती

**पनवेल : वार्ताहर**

एका गरीब मातेची आपल्या यशोदा फर्टिलिटी आणि आयव्हीएफ केंद्रात मोफत प्रसूती करून डॉ. बाळासाहेब खडबडे आणि डॉ. स्नेहलता खडबडे या दांम्पत्याने एक प्रकारे माणुसकीचे नाते जपले. पैसे नसलेल्या एका गरोदर मातेला आणि तिच्या बाळाला खऱ्या अर्थाने मदतीचा हात देऊन खडबडे दाम्पत्यांनी बांधिलकी जपून आदर्श वस्तूपाठ ठेवला आहे. अर्थात दिशा महिला व्यासपीठाचा समन्वय ही तितकाच महत्त्वाचा ठरला आहे.

आजच्या घडीला खाजगी रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणात शुल्क घेतले जाते. या ठिकाणचे उपचार सर्वसामान्यांना न परवडणारे असतात. पनवेल परिसरात उपजिल्हा रुग्णालय शिवाय एकही शासकीय प्रसूती गृह नाही. त्यामुळे गोरगरीब गरजू महिलांची परवड होते. कित्येकदा पैसे नसल्याने घरीच बाळंतपण केले जाते.



त्यामुळे आई आणि बाळाच्या जीवाला एक प्रकारे धोका निर्माण होतो. दरम्यान, दिशा महिला मंचने आयोजित केलेल्या नवदुर्गा सन्मान नारीशक्तीचा या कार्यक्रमांमध्ये यशोदा फर्टिलिटी आणि आयव्हीएफ केंद्र गरजू महिलांना मोफत मातृत्व सेवा आणि उपचार देण्याची घोषणा डॉक्टर असलेल्या खडबडे दांपत्याने केली. यावर्षी गीत पाटील या भगिनीला मोफत प्रसुती सेवा देण्यात आली. गीतने ६ जून, २०२३ रोजी रात्री ६:४९ वाजता बाळाला जन्म दिला. शस्त्रक्रिया करून डॉक्टरांनी ही प्रसूती केली.

विशेष म्हणजे आई आणि बाळ सुखरूप आहेत. दिशाच्या संस्थापिका निलम आंधळे आणि उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी रुग्णालयात जाऊन गित व तिच्या बाळाच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्याचबरोबर डॉक्टरांचे सुद्धा आभार मानले.

> **गीत पाटील या भगिनीने यशोदा हॉस्पिटलमध्ये बाळाला जन्म दिला. शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय उपचार मोफत रीत्या करण्यात आले. अशाच प्रकारे इतर वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांनीही समाजाच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सेवा देण्यासाठी पुढे आले पाहिजे.**
>
> **–निलम आंधळे, संस्थापिका, दिशा व्यासपीठ**

# पेण एसटी स्टॅण्ड रस्त्याची गैरसोय दूर करा

## ■ अजय क्षीरसागर यांचे उपोषण ■ नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी दिला पाठिंबा

**पेण : प्रतिनिधी**

पेण एसटी आगारातील अंतोरा रोड येथे जाण्या-येण्यासाठी असलेली गल्ली कोरोना काळात बंद करण्यात आली होती, परंतु कोरोना प्रादुर्भाव कमी झाल्यावरदेखील ही गल्ली सुरू न केल्याने नागरिकांची गैरसोय होऊ लागली. याबाबत माजी नगरसेवक अजय क्षीरसागर तसेच काही सामाजिक संघटनांनी या विरोधात आवाज उठविला तसेच एसटी प्रशासनाला वारंवार निवेदनेही दिली.



(छाया : इजाज मनियार)

एसटी प्रशासनाचे आडमुठे धोरण व अधिकारी वर्गाची अनुत्सुकता यामुळे हा प्रश्न मार्गी लागला नाही. यामुळे नागरिकांचे हित लक्षात घेता माजी नगरसेवक अजय क्षीरसागर यांनी एसटी प्रशासनाला १० जूनला उपोषण करण्याचा इशारा दिला होता. त्यांनी एसटी आगारात उपोषणास प्रारंभ केला.

या वेळी माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, नगरसेविका शहनाज मुजावर, माजी नगरसेवक जनार्दन जाधव, हिमांशू कोठारी, नरेन जाधव, रवींद्र म्हात्रे, प्रशांत तेलवणे, विकास गोरी, जितेंद्र लोखंडे, भगवान झेमसे, परवेज मनियार, राजू अनारसे, भरत बडेला, दिलीप ओगलीया आदींनी या उपोषणास पाठिंबा दिला. तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, मुख्याधिकारी जीवन पाटील, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ तसेच जिल्हा नियंत्रक दीपक घोडे साहेब, डेपो मॅनेजर अपर्णा वर्तक यांनीही या वेळी उपोषणस्थळी भेट दिली.

माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले की, गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून हि वाट सुरू होती त्यावेळी एसटी प्रशासनाला काही त्रास झाला नाही आणि आता कसला त्रास होतोय ही बाब म्हणजे एसटी प्रशासनाचा वेळकाढूपणा व अधिकारी वर्गाचे आठमुठे धोरण असून नागरिकांची गैरसोय करण्याचे काम एसटी प्रशासन करीत असून आता हे सहन करणार नाही.

दरम्यान, जिल्हा वाहतूक नियंत्रक दीपक घोडे यांनी वरिष्ठांकडे पाठपुरावा करून याबाबत कार्यवाही करू असे सांगितले असता उपोषणकर्ते अजय क्षीरसागर व नागरिकांनी आक्रमक भूमिका घेत ही वाट आजच चालू करावी अन्यथा आम्ही हि भिंत तोडून टाकू असे सांगितले.

गेली अनेक वर्षे सूर असलेली वहिवाट कोरोना काळात बंद करण्यात आली होती ती चालू करणे गरजेचे होते, परंतु या उलट एसटी प्रशासनाने ही वाट कायमची बंद करून टाकली यामुळे एसटी स्थानकात येणारे वृद्ध, शालेय विद्यार्थी, येथील नागरिक यांना त्रास होऊन त्यांना राजू पोटे मार्गावरून वळसा घालून या बाजूला यावे लागत होते. यामुळे एक सामाजिक भावनेतून जा उपोषण केले असून एसटी प्रशासनाने सोमवारपर्यंत हि गल्ली सुरू करणार असल्याचे लेखी निवेदन दिले असून उपोषण सोडत असल्याचे अजय क्षीरसागर यांनी सांगितले. या वेळी तहसीलदार, मुख्याधिकारी, पोलीस प्रशासन व पेणमधील नागरिक यांनी चांगले सहकार्य केल्याबद्दल त्यांनी आभार मानले.

### आश्वासन पूर्ण न झाल्यास भिंत तोडण्याचा इशारा

**चर्चा होऊनही प्रश्न सूटत नसल्याचे पाहून एसटी अधिकारी यांनी शेवटी येत्या सोमवारी (दि. १२ जून) सायंकाळी ५ वाजेपर्यंत हि वाट सुरू करण्यात येईल, असे लेखी आश्वासन अजय क्षीरसागर यांना दिले. सोमवारी जर ही वाट एसटी प्रशासनाने सुरू केली नाही तर आम्ही पेणकर नागरिक व सर्व कार्यकर्ते मिळून ही वाट भिंत तोडून सुरू करू, असा इशारा या वेळी माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी दिला.**

# मुंबई-गोवा महामार्गावर खासगी बसला अपघात

## प्रवासी बचावले

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड तालुक्यातील वीर गावा हद्दीत साई स्वरा ट्रॅव्हल ही खासगी बस रस्त्याकडेला असलेल्या डिवार्डरला धडकली, मात्र सुदैवाने या अपघातात कोणालाही दुखापत झाली नाही. या बसमध्ये ४४ प्रवासी प्रवास करत होते. यामध्ये लहान मुलांची संख्यादेखील जास्त होती.

मुंबई-गोवा महामार्गावर मालवण ते मुंबई जाणारी साई स्वरा ट्रॅव्हल ही खासगी बस (एमएच ०४ एफके ३६९९) महाड तालुक्यातील वीर गाव हद्दीत शनिवारी (दि. १०) पहाटे ४:४५ वाजण्याच्या सुमारास आल्यानंतर अचानक बस वरून चालकाचा ताबा सुटला आणि बस रस्त्या कडलेला असलेल्या लोखंडी गार्ड ला तोडत गेली आणि या गार्ड मधेच रस्त्या कडेला अडकून पडली. शेजारी जवळपास ३० फूट खोल भाग होता, जर बस उलटली असती तर मोठी दुर्घटना घडू शकली असती सुदैवाने कोणतीच जिवीत हाणी झाली नाही.

या अपघातातील सर्व प्रवासी सुखरूप असुन सर्व प्रवाशांना दुसऱ्या बसने मार्गस्थ रवाना करण्यात आले. घटनास्थळी महाड तालुका पोलीस आणि महामार्ग वाहतूक पोलीस महाड यांनी धाव घेत वाहतूक सुरळीत केली आणि प्रवाशांना मार्गस्थ रवाना करण्यास मदत केली.


**परिशिष्ट क्र. १६**
**(उपविधी क्र. ३५ अन्वये)**
**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना**
**(मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**

**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नवीन पनवेल, या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत/भूखंडावर/गाळा/बंगला क्र. ............... धारण करणाऱ्या श्री. वसंत पांडुरंग रेडेकर यांचे तारीख १०/०८/२०१८ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांसहरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे सकाळी/दुपारी ११ ते सकाळी/दुपारी ०४ पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १०/०६/२०२३,

**सही/-**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित**
**सेक्टर २, नवीन पनवेल**


# आव्हाडांवर गुन्हा दाखल करा

## खोपोलीत भाजप महिला मोर्चाची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे नेते तथा आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भाजप महिला मोर्चा अध्यक्षा चित्राताई वाघ यांची मानहानी आणि बदनामी केल्याबाबत त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, असे निवेदन खोपोली पोलीस स्टेशन येथे जाऊन पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांना निवेदन देण्यात आले.

या वेळी उत्तर रायगड जिल्हा महिला मोर्चा भाजप अध्यक्ष अश्विनी पाटील, खोपोली शहर अध्यक्ष महिला मोर्चा शोभा काटे, सरचिटणीस अश्विनी अत्रे, माजी नगरसेविका अपर्णा मोरे, उ. रा. जिल्हा सदस्य अनिता शहा, उ. रा. जिल्हा सदस्या सुनीता पाटणकर, खोपोली शहर फादर बॉडी चिटणीस गीता मोहिते, उपाध्यक्ष खोपोली शहर महिला मोर्चा अस्मि सावरेकर आदी उपस्थित होत्या.

दरम्यान, उत्तर रायगड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये खोपोलीसह इतर सर्व विभागांतील महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निवेदन देऊन जितेंद्र आव्हाड यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली.





# आमदार भरत गोगावलेंकडून राम डांगे यांची विचारपूस



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील आड चांभारगणी येथील सामाजिक कार्यकर्ते व रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी कार्यकारी संचालक राम डांगे यांना जुन्या वादातून अचानक मारहाण झाली. या मारहाणीत डांगे यांची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने त्यांना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर महाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी त्यांची रुग्णालयात भेट घेऊन आस्थापुर्वक चौकशी केली.

या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख अहिरे आणि कृऊबा समिती संचालक लक्ष्मण मोरे तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकतीमधील मालक - सौ. आशा एकनाथ देशमुख, तसेच यांचे पती - श्री. एकनाथ मल्हारी देशमुख, मुलगा - राजेंद्र एकनाथ देशमुख, अभिजीत एकनाथ देशमुख, यांनी सदर मिळकत विक्रीस काढली आहे व माझे अशिल **१) सौ. विद्या दिलीप मोरे २) श्री. गौरव दिलीप मोरे** सदरहू खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत कायमस्वरुपी विकत घेत आहेत. तरी सदर जमिन मिळकतीवर जर कोणाचा विक्री गहाण, दान, बक्षिस, लिज, पोटगी, कोर्ट, जप्ती, वहिवाट, विकसनाचा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस जाहीर प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रानीशी पुराव्यासह लेखी हरकत खालील दिलेल्या पत्त्यावर पाठवावी. जर १५ दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध आहे असे समजुन अथवा कोणाचाही हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजुन सदर जमिन मिळकत खरेदीविक्री करण्याचा पुढील व्यवहार पूर्ण करतील.

**मिळकतीचे वर्णन**

तुकडी जिल्हा रायगड, पोटतुकडी तालुका खालापूर, जिल्हा परिषद रायगड, मे. दुय्यम निबंधक साहेब खालापूर तसेच तलाठी सजा दासांबे यांचे अधिकार क्षेत्रात असलेली **मौजे - तळेगांव, ता. खालापूर, जिल्हा रायगड** येथील मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची जमिन मिळकत असून सदर जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नांव | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.प्र. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| तळेगांव | ४३/६ | ०-१०-०० पो.ख. ०-००-०० | ०-२७ |
| तळेगांव | ३७/३ | ०-०२-०० पो.ख. ०-००-०० | ०-१९ |
| तळेगांव | ३७/२ | ०-०३-०० पो.ख. ०-००-०० | ०-३० |
| तळेगांव | २७/३ | ०-४१-०० पो.ख. ०-००-०० | ८-७५ |
| तळेगांव | ३४/११ | ०-५०-०० पो.ख. ०-००-०० | ९-७६ |

**एकूण क्षेत्र १०६ गुंठे त्यापैकी २६.५० गुंठे जमिनीचे कायम फरोक्त खताद्वारे देत आहे.**

या मिळकतीमधील वरिल उल्लेख केलेल्या मालकाचे क्षेत्र.
दिनांक : ०८/०६/२०२३

**सही/-**
**ॲड. लक्ष्मण अ. कोईरी**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
पत्ता : १०८/बी, न्यू गणेशकृपा सोसायटी, निअर मॉडेल कॉलेज, चिंचपाडा रोड, कल्याण(पू), ता. कल्याण, जि. ठाणे.
मो. नं. ९८९२४९७४५३


# वाकी नदीपात्रातील अतिक्रमणाची प्रशासनाकडून पाहणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील आसरे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या वाकी नदीपात्रालगत बांधण्यात आलेल्या दगडी भिंतीची तहसीलदार आयुब तांबोळी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली. त्यांच्यासोबत पाटबंधारे विभागाचे अधिकारी, जांभिवली गावातील शेतकरीदेखील उपस्थित होते.

वाकी नदीपत्राजवळ मुंबईतील धनिकाने जागा खरेदी करीत नदीपात्रालगत १८० मीटर लांब व दोन मीटर उंचीची दगडी भिंतीचे बांधकाम पाटबंधारे विभागाची परवानगी न घेता केले आहे. या भिंतीमुळे पावसाळ्यात पाण्याचा लोंढा उजव्या बाजूकडे घुसून जांभिवली भागातील शेती पाण्याखाली जाणार आहे. हवालदिल शेतकऱ्यांनी खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांची भेट घेत न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती. तहसीलदारांनी पाटबंधारे विभागाचे मुख्य अभियंता भरत गुंटूरकर, बांधकाम करणारा धनिक आणि जांभिवली गावचे शेतकरी यांची तहसील कार्यालय येथे बैठक आयोजित केली होती.



बैठकीत शेतकरी आणि बांधकाम करणारा धनिकाची बाजू ऐकल्यानंतर तहसीलदार आयुब तांबोळी, नायब, तहसीलदार सुधाकर राठोड, पाटबंधारे विभाग अधिकारी आणि शेतकरी घटनास्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. पाटबंधारे विभागाचे अधिकारी गुंटूरकर यांनीदेखील नदीपात्रालगत भिंतीचे काम नियमबाह्य असल्याचे मान्य केले असून तहसीलदार तांबोळी यांनी पाटबंधारे विभागाला दोन दिवसांत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

**आमरण उपोषणाची वेळ तहसीलदारांनी येवू दिली नाही. आता पाटबंधारे विभागाने कारवाई लवकरात लवकर करावी.**
**-सुरेश गावडे, शेतकरी, जांभिवली**

# वीकेण्डची वाहतूक कोंडी सूटेना!

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे दृतगती महामार्गावर नेहमीप्रमाणे वीकेण्डला बोरघाटात वाहनांची गर्दी होत असल्याने, प्रचंड प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

मुंबईकर शनिवार-रविवार सुटी असल्याने या परिसरातील लोणावळा, खंडाळा तसेच या भागातील पर्यटनस्थळांना भेटी देत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहने मुंबईहून पुणे महामार्गावर येत असतात तसेच बोरघाटात अनेक ठिकाणी रस्ता अरुंद असल्यानेही वाहनांच्या रांगाच रांगा दिसून येत असतात.

दृतगती महामार्गावर वाहनांची गर्दी झाल्याने अनेक वाहने जुन्या राष्ट्रीय महामार्गावर वळतात हा मार्ग बोरघाटातून जात असल्याने अंडापॉईंट येथे बस दुर्घटनेनंतर मोठ्या वाहनांना बंदी करण्यात आली असल्याने त्यासाठी सुरक्षा बेरीगेट लावण्यात आले आहेत अनेक नवीन वाहनचालकांना सुरक्षा बॅरिगेटची माहिती नसल्याने पुढे गेल्यानंतर त्यांना पुन्हा माघारी फिरावे लागते, त्याचप्रमाणे मागून आलेली वाहने आणि ही यु-टर्न घेणारी वाहने यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी अंडा पॉईंटच्या जवळ पहावयास मिळते.

महामार्ग पोलिसांचे अपुरे पोलीस बळ त्यामुळे प्राप्त परिस्थितीत पोलिसांना शनिवार व रविवारी तारेवरची कसरत करावी लागते असे चित्र पाहावयास मिळते. खोपोली नजीक तिसऱ्या महामार्गाचे बोगद्यातून काम सुरू आहे, हे काम पूर्ण झाल्यानंतरच या मार्गावरील शनिवार व रविवार होणाऱ्या वाहतूक कोंडीचा तिढा सुटेल, असे बोलले जात आहे. अलिकडेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या तिसऱ्या महामार्गाचे कामाचे निरीक्षण करून तातडीने हा महामार्ग सुरू करण्यात यावा, असे अधिकाऱ्यांना आदेश दिले आहे त्यानुसार कामही वेगाने सुरू आहे. त्यामुळे तिसऱ्या महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतरच दिलासा मिळेल, असे बोलले जात आहे.



(छाया : जयवंत माडपे)

# सूर्यकांत चंचे पुरस्काराने सन्मानित



**कर्जत : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाचे निवृत्त कनिष्ठ अभियंता सूर्यकांत चंचे यांना राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे वतीने गुणवंत कामगार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील रहिवाशी असलेले सूर्यकांत चंचे हे २०२१ मध्ये ३१ वर्षे सेवा केल्यानंतर सेवानिवृत्त झाले होते. बांधकाम विभागाच्या माध्यमातून गुणवत्ता पूर्ण काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन्मानित करीत असते.

या पुरस्काराचे वितरण मुंबई येथे बांधकाम भवन येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात करण्यात आले. राज्यातील ५४ गुणवंत कामगारांना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचे हस्ते मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कोकण विभागातून निवृत्त कनिष्ठ अभियंता सूर्यकांत चंचे यांना त्यांच्या स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून केलेल्या कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले. या वेळी बांधकाम विभागाचे अतिरिक्त सचिव मनीषा पाटणकर म्हैसकर, मुख्य अभियंता हांडे आदी उपस्थित होते.

## फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा

# आज जोकोव्हिच वि. रूड फायनल



**पॅरिस : वृत्तसंस्था**

सर्बियाच्या नोव्हाक जोकोव्हिचने पायाच्या दुखापतीने त्रस्त झालेल्या स्पेनच्या कार्लोस अल्कराझचा ६-३, ५-७, ६-१, ६-१ असा पराभव करून सातव्यांदा फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेची अंतिम फेरी गाठली, तर दुसरीकडे नॉर्वेचा कॅस्पर रूड याने जर्मनीचा अॅलेक्झांडर झ्वेरेव्ह याच्यावर ६-३, ६-४, ३-० अशी मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला. आता रविवारी (दि. ११) जोकोविच आणि रूड यांच्यात फायनल रंगणार आहे.

जोकोव्हिचने पहिल्या सेटपासून आपल्या खेळातील आक्रमकता दाखवली. पहिला सेट जोकोव्हिचने अगदी सहज जिंकला, पण जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या अल्कराझने दुसऱ्या सेटमध्ये कमालीची लढाऊ वृत्ती दाखवत अगदी अखेरच्या क्षणी दुसरा सेट जिंकून बरोबरी साधली. तिसऱ्या सेटपासून अल्कारझला पायात वेदना जाणवू लागल्या. त्याच्या हालचाली आणि फटक्यातील वेग मंदावला होता. याचा फायदा घेत जोकोव्हिचने तिसरा आणि चौथा सेट अगदी सहज जिंकून विजयावर शिक्कामोर्तब केले. उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात कॅस्पर रूडने अॅलेक्झांडर झ्वेरेव्हचा एकतर्फी पराभव केला.

नोवाक जोकोविच फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या सातव्यांदा फायनलमध्ये पोहोचला आहे. याआधी त्याला ही स्पर्धा दोन वेळा जिंकता आली आहे. जोकोविचने २०१६ व २०२१मध्ये फ्रेंच टेनिस स्पर्धेचे जेतेपद पटकाविले आहे, तर २०१२, २०१४, २०१५ व २०२०मध्ये त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. जोकोविचने ही स्पर्धा तिसऱ्यांदा जिंकण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवले असेल.

### जोकोविचची विक्रमी जेतेपदाकडे वाटचाल

नोवाक जोकोविच याने उपांत्य फेरीतील विजयासह विक्रमी अजिंक्यपदाकडे दिमाखात वाटचाल केली आहे. जोकोविच व राफेल नदाल यांनी सर्वाधिक २२ ग्रँडस्लॅम जेतेपदे पटकाविली आहेत. आता जोकोविचला २३व्या ग्रँडस्लॅम विजेतेपदाला गवसणी घालण्याची संधी असणार आहे.

# दिल्ली कॅपिटल्सच्या प्रशिक्षकपदावरून रिकी पाँटिंगची उचलबांगडी होणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचा माजी अध्यक्ष सौरव गांगुली आगामी आयपीएल हंगामात दिल्ली कॅपिटल्सच्या संघाचा मुख्य प्रशिक्षक असणार आहे. ऑस्ट्रेलियन दिग्गज रिकी पाँटिंगची उचलबांगडी होणार असून क्रिकेटच्या 'दादा'ची प्रशिक्षकपदी वर्णी लागणार आहे.

### सौरव गांगुली सांभाळणार धुरा



आयपीएलचा सोळावा हंगाम दिल्ली संघासाठी एका वाईट स्वप्नाप्रमाणे राहिला. डेव्हिड वॉर्नरच्या नेतृत्वातील दिल्लीला पहिल्या पाच सामन्यांमध्ये पराभव स्वीकारावा लागला होता. त्यामुळे आगामी हंगामात प्रशिक्षकपदावरून रिकी पाँटिंगची उचलबांगडी होणार असल्याचे दिसते. ऑस्ट्रेलियन दिग्गज २०१८मध्ये दिल्लीच्या संघात सहभागी झाला होता. आयपीएलच्या इतिहासात पहिल्यांदाच दिल्लीचा संघ २०२०मध्ये अंतिम फेरीत पोहचला होता तसेच २०२१च्या हंगामातदेखील दिल्लीच्या संघाने चमकदार कामगिरी केली होती, पण मागील दोन हंगामापासून दिल्लीचा संघ आपली जादू दाखवण्यात अपयशी ठरला आहे. २०२२मध्ये हा संघ गुणतालिकेत पाचव्या, तर २०२३मध्ये नवव्या स्थानावर राहिला.

'संगबाद प्रतिदिन' या बंगाली वृत्तपत्रातील वृत्तानुसार सौरव गांगुली दिल्लीच्या संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारण्यास तयार आहे तसेच तो दिल्लीच्या फ्रँचायझीमध्ये संघाचे संचालक म्हणूनदेखील कार्यरत राहणार आहेत.

# टीम इंडिया थेट एशिया कपच्या अंतिम फेरीत खेळणार

## ज्युनिअर महिला हॉकी स्पर्धेच्या सेमीफायनलमध्ये जपानचा पराभव

**इस्तंबूल : वृत्तसंस्था**

भारतीय ज्युनिअर महिला हॉकी संघाने इतिहास रचला आहे. ज्युनिअर एशिया कप २०२३च्या सेमीफायनलमध्ये टीम इंडियाने यजमान जपानचा पराभव करीत थेट फायनलमध्ये धडक मारली आहे. टीम इंडियाने जपानचा १-० असा पराभव केला.

भारताकडून सुनिलिता टोप्पोने सामन्यात एकमेव गोल केला. तोच गोल निर्णायक ठरला. ज्युनिअर एशिया कप स्पर्धेत टीम इंडियाने दुसऱ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. याआधी २०१२मध्ये भारताने अंतिम फेरी गाठली होती. २९ सप्टेंबर ते १० डिसेंबरदरम्यान चिलीमध्ये ही स्पर्धा होणार आहे.

सेमीफायनलमध्ये जपानने भारतीय संघाच्या खेळाडूंवर सामन्याच्या सुरुवातीपासूनच दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. जपानला काही पेनल्टी कॉर्नरही मिळाले, पण भारताच्या भक्कम बचावापुढे त्यांना गोल करण्यात अपयश आले. त्यामुळे सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये दोन्ही संघांना गोल करता आला नाही. दुसऱ्या हाफमध्ये दोनही संघांनी आपला खेळ आक्रमक केला. गोलच्या दिशेने दोनही संघांच्या खेळाडूंनी अनेक चाली रचल्या. जपान दोन वेळा गोल करण्याच्या अगदी जवळ पोहोचले, मात्र भारताची गोलकिपर माधुरी किंडोने दोनही वेळा जबरदस्त बचाव करीत त्यांचे प्रयत्न हाणून पाडले.

सामन्याच्या तिसऱ्या क्वार्टरमध्ये जपानने चेंडू आपल्याकडेच ठेवत भारतीय संघावर दबाव वाढवला. जपानच्या आक्रमणापुढे भारतीय संघ काहीसा बॅकफुटवर गेला. यादरम्यान भारतीय संघाला एक पेनल्टी कॉर्नर मिळाला, पण त्याचे गोलमध्ये रुपांतर करण्यात भारतीय संघाला अपयश आले. त्यामुळे सामन्याचा तिसरा क्वार्टरही गोलशुन्य राहिला.

सामन्याचा चौथा क्वार्टर सुरू झाल्यानंतर मात्र भारतीय संघाने जपानला बॅकफूटवर ढकलत चेंडूवर ताबा मिळवला. भारतीय खेळाडूंच्या आक्रमक खेळामुळे यजमान जपनावर दबाव वाढला. याचा फायदा घेत भारताच्या सुनीा टोप्पोने शानदार गोल केला. या गोलमुळे भारतीय संघाला १-० अशी आघाडी मिळाली. सामन्याच्या शेवटपर्यंत ही आघाडी कायम ठेवत भारतीय संघाने यजमान जपानला त्यांच्याच मैदानात धूळ चारली.

या स्पर्धेचा अंतिम सामना ११ जूनला खेळवला जाणार आहे. चीन आणि कोरियातील विजेत्या संघाबरोबर टीम इंडिया चॅम्पियनशीपसाठी भिडेल.



### उरणच्या शुभम म्हात्रेला सुवर्णपदक

**उरण : बातमीदार**

पुणे येथे झालेल्या वाको महाराष्ट्र सिनियर आणि मास्टर चॅम्पियनशिप या राज्यस्तरीय स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत शुभम परशुराम म्हात्रे (जासई, उरण) याने किक लाईट व क्रियेटिव्ह टीम फॉर्म प्रकारात सुवर्णपदक जिंकले. यामुळे त्याची पंजाबमध्ये होणाऱ्या वाको नॅशनल सिनियर चॅम्पियनशिपसाठी निवड झालीये.

शुभमला प्रशिक्षक संतोष मोकल व जीवन यांचे मार्गदर्शन लाभले. उत्तम कामगिरी करीत सुवर्णपदक मिळविल्याने शुभमवर सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.


**OPEN WALK IN INTERVIEW**

**We require following candidates for our production site at URAN, Navi Mumbai.**

* Machine Operator — 5 to 10 yrs exp.
(CNC Turning Center, VMC Operator / Programmer)

* Machine Shop Supervisor — 5 to 10 yrs exp.
(CNC Turning Center, VMC Operator / Programmer)

* Designer — 10 yrs exp.
(Diploma / B.E. with CAD/CAM)

* Quality Control Inspector — 10 yrs exp.
(Diploma / B.E. with CAD/CAM)



Walk in interviews on
Monday – 12/06/2023
to
Saturday – 17/06/2023

Send your resumes on :
rahul@sgppropulsion.com
info@shreegajanan.co.in
kiran@sgppropulsion.com

SGP
**Shree Gajanan Workshop**
Dronagiri, Uran, Navi Mumbai.
https://www.shreegajanan.com
9821183387, 9819994020


# लिओनेल मेस्सी इंटर मियामीकडून खेळणार



**मियामी : वृत्तसंस्था**

तारांकित फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीने अमेरिकेतील इंटर मियामी संघाशी करार करण्याचा निर्णय घेतला आहे. सात बॅलन डी'ओर विजेत्या मेसीने अमेरिकेतील संघाशी करारबद्ध होणे हा युरोपीय फुटबॉलसाठी आणखी एक धक्का आहे.

अर्जेंटिनाचा कर्णधार आणि फुटबॉल इतिहासातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंपैकी एक असलेल्या मेसीचा फ्रेंच क्लब पॅरिस सेंट-जर्मेनसोबतचा करार या हंगामाअंती संपुष्टात आला. त्यानंतर ३५ वर्षीय मेस्सी कोणत्या क्लबकडून खेळण्याचा निर्णय घेणार याकडे संपूर्ण फुटबॉल विश्वाचे लक्ष होते. माजी संघ बार्सिलोना किंवा पैशाने संपन्न सौदी अरेबियन लीगमधील अल हिलाल संघाशी मेस्सी करारबद्ध होऊ शकेल अशी चर्चा सुरू होती, मात्र मेस्सीने माजी नामांकित फुटबॉलपटू डेव्हिड बेकहॅमची मालकी असलेल्या इंटर मियामी संघाशी करार करण्याचा निर्णय घेतला.

गेल्या काही काळात ख्रिस्तियानो रोनाल्डो, करीम बेन्झिमा यांसारख्या तारांकित खेळाडूंनी युरोपीय क्लब सोडून सौदी अरेबियातील क्लबशी अब्जावधीचा करार केला आहे. गतवर्षी अर्जेंटिनाला विश्वविजेतेपद मिळवून देणाऱ्या मेस्सीवर आता इंटर मियामी संघाला यश मिळवून देण्याची जबाबदारी असेल. करारामुळे मेस्सीला भविष्यात या संघाची मालकी मिळवण्याची संधी मिळेल.

# हरभजनने जिंकली चाहत्यांची मने



**मुंबई** : भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंग सध्या इंग्लंडमध्ये असून भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलवर समालोचन करीत आहे. कॉमेंट्रीव्यतिरिक्त भज्जीने असे काही केले आहे, ज्यामुळे तो प्रसिद्धीच्या झोतात आला असून चाहते त्याचे खूप कौतुक करीत आहेत.

ओव्हलच्या मैदानावर हरभजन सिंग एका अपंग पाकिस्तानी चाहत्याला ऑटोग्राफ देण्यासाठी गुडघे टेकून बसला. या वेळी हरभजनने गुडघ्यावर बसून फॅनसोबत फोटोही काढला. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर हायरल होत आहे.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com